K L THAKUR AND SONS SARAF
Since 1928
Gold | Silver | Diamond
3209, Bagwanpur, Kamod Road, Nasik-422001
0253-2505488 | 2504258

नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक
किंमत २
# भ्रमर
BHRAMAR

Physioflex
Working towards healthy lifestyle
Physiotherapy Clinic & Fitness Studio
Dr. Moinuddin Farooque (CEO physioflex)
PHYSIOTHERAPIST (M.S.PT.)
9021756646 8329099901
Physiofit Clinic, Shop Number 2, Jumma Masjid, Naikwadi Pura, Patil Gali, Old Nashik
Shivraya Multi Speciality Hospital, DGP Nagar 2, Ambad Link Rd., Near Mauli Lawns, Kamatwade, Nashik

वर्ष ५२ वे, अंक २३९
Year : 52, Issue No. : 239
नाशिक, शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५
Nashik, Saturday 1 February 2025
R.N.I. Regd. No.20904/72
Postal Reg. No. NSK/16/2024-2026
पाने ६, किंमत २ रुपये
Pages : 6, Price Rs. 2

## भरधाव वेगात दोन कार एकमेकींवर धडकल्या, ३ ठार

**बीड (भ्रमर वृत्तसेवा) :- अहमदपूर - अहिल्यानगर महामार्गावर भीषण अपघात झाला असून मध्यरात्रीच्या सुमारास दोन कार एकमेकींना समोरासमोर धडकल्याने ३ जणांचा मृत्यू झाला आहे.**

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील चंदन सावरगाव येथे मध्यरात्रीच्या सुमारास झालेला हा अपघात इतका भीषण होता की दोन्ही कारचा चक्काचूर झाला आहे. अपघातात मृत झालेल्या व्यक्तींची ओळख अद्याप पटलेली नाही. पोलीस अधिक तपास करत आहेत आणि मृतांची ओळख पटवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

मध्यरात्रीच्या वेळी अहमदपूर – अहिल्यानगर महामार्गावर दोन कार भरधाव वेगाने समोरासमोर धडकल्या. धडक इतकी जोरदार होती की, दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जखमी गंभीर अवस्थेत होता. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. अपघात झाल्याचे लक्षात येताच स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना मदत करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी तातडीने पोलीस आणि आपत्कालीन सेवेला माहिती दिली. युसुफ वडगाव पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले होते. या अपघातामुळे महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. पोलीस प्रशासनाने तत्काळ व्यवस्था लावून वाहतूक सुरळीत केली.

महामार्गावर अनेकदा भरधाव वेग आणि वाहनचालकांचे नियंत्रण सुटल्याने अपघात होतात. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महामार्गावर वारंवार अपघात होण्याचे कारण म्हणजे वाहतुकीचे नियम न पाळणे, वाहनांचा वाढता वेग आणि रात्रीच्या वेळी कमी दिसणारी वाहतूक चिन्हे असून वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी वारंवार होत आहे.

## व्यवसायात भागीदारी देण्याचे आमिष दाखवून अडीच कोटींची फसवणूक

### एकाच कुटुंबातील तिघांविरुद्ध गुन्हा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- मायनिंगच्या व्यवसायात भागीदारी देण्याचे आमिष दाखवून पोकलेन मशीन व डंपर स्टोन क्रशरचे संपूर्ण युनिट स्वतःच्या व्यवसायासाठी वापरून एका इसमाची अडीच कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी ठाण्याच्या एकाच कुटुंबातील तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की आरोपी संजीव शंकर आव्हाड, मीना संजीव आव्हाड व कार्तिक संजीव आव्हाड (सर्व रा. कैलासनगर, वालीवली, बदलापूर, जि. ठाणे) यांनी संगनमत करून फिर्यादी संजय शांताराम सांगळे (रा. कॅनडा कॉर्नर, नाशिक, मूळ रा. मनमाड) यांच्याशी संपर्क साधला व सांगळे यांना बांधकाम व्यवसायासाठी लागणारे दोन जेसीबी मशीन, दोन पोकलेन मशीन व चार डंपर, स्टोन क्रशरचे संपूर्ण युनिट, तसेच मायनिंगच्या व्यवसायात भागीदारी देण्याचे आमिष दाखविले.

फिर्यादी सांगळे व आरोपी आव्हाड हे एकमेकांचे परिचित असल्याने सांगळे यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला व आरोपींच्या प्रस्तावाला होकार दिला. त्यानंतर आव्हाड कुटुंबीयांनी फिर्यादी सांगळे यांच्याकडून अडीच कोटी रुपयांची रक्कम स्वीकारली. त्यानंतर या रकमेचा स्वत:च्या वैयक्तिक फायद्याकरिता व व्यवसायाकरिता वापर केला, तसेच जेसीबी, पोकलेन मशीन, वाहन व इतर साहित्य परत न देता सांगळे यांची अडीच कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केली. हा प्रकार फेब्रुवारी ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत कॅनडा कॉर्नर, एसक्यू बिझनेस सेंटर येथे घडला.

या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात आव्हाड कुटुंबीयांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक जानकर करीत आहेत.

## घरासमोरील महिलेने लांबविल्या चार तोळे दागिन्यांसह महागड्या वस्तू

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** घराचा मुख्य दरवाजा कशाच्या तरी सहाय्याने तोडून घराच्या समोरच राहणाऱ्या महिलेने चार तोळे सोन्याच्या दागिन्यांसह पैंजण, महागड्या साड्या, रोख रक्कम, तसेच सौंदर्यप्रसाधने असा २ लाख ८७ हजारांचा ऐवज चोरून नेल्याचा प्रकार त्रिमूर्ती चौकात घडला.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी शंकर भगवानसिंग लाल व आरोपी अनुराधा अमोल चौहाण (दोघेही रा. उंटवाडी रोडजवळ, त्रिमूर्ती चौक, नाशिक) हे एकमेकांच्या घरासमोर राहतात. फिर्यादी लाल हे अंबड एमआयडीसी कंपनीत खासगी नोकरी करतात. त्यांच्या पत्नी प्रभा लाल या दि. ३० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास सामान खरेदी करण्यासाठी त्रिमूर्ती चौकातील मार्केटमध्ये गेल्या होत्या. फिर्यादी लाल हे साडेतीन वाजेच्या सुमारास घरी येत असताना त्यांच्या पत्नी त्रिमूर्ती चौकात भेटले. ते दोघे जण सोबत घरी आले. त्यांच्या घराच्या दरवाजाचे लॅचलॉक दोन वेळा फिरविल्यावर लॉक होते आणि दोन वेळा फिरविल्यावर उघडते; मात्र त्या दिवशी एकदा चावी फिरविल्यावर दरवाजा उघडला, तेव्हा त्यांना संशय आला. त्यानंतर घरात लाल यांनी घरात जाऊन सीसीटीव्ही चेक केले असता त्यांना साडेअकरा वाजता फ्लॅटसमोर राहणारी संशयित महिला अनुराधा अमोल चौहाण ही लाल यांच्या फ्लॅटच्या दुकानातून प्रवेश करीत असल्याचे सीसीटीव्हीत दिसले. त्यांनी घरातील बेडरूममध्ये असलेल्या लॉकरमध्ये ठेवलेले सामान व्यवस्थित आहे की नाही, याची पाहणी केली असता त्यात २८ ग्रॅम वजनाची ८४ हजार रुपये किमतीची सोन्याची चेन, ३३ हजार रुपये किमतीची ११ ग्रॅम वजनाची कानातील रिंग, तीन हजार रुपये किमतीच्या दोन महागड्या साड्या, १९ हजार रुपये किमतीचे ३८० ग्रॅम वजनाचे चांदीचे पैंजण, तीन हजार रुपये किमतीचे सीताफळ फेस क्रीम, परफ्यूमची एक डबी, तसेच १ लाख ४३ हजार रुपयांची रोख रक्कम अशी एकूण २ लाख ८७ हजार रुपयांच्या ऐवजाची चोरी झाल्याचे लक्षात आले. ही चोरी फ्लॅटसमोर राहणाऱ्या अनुराधा चौहाण या महिलेनेच केल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून, या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जमिनीची कागदपत्रे खरी असल्याचे भासवून ७७ लाख ५० हजारांची फसवणूक

### वैभव देवरेसह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नवीन नाशिक (प्रशांत निरंतर) :-** जमिनीचे बनावट कागदपत्र दाखवून ते खरे असल्याचे भासवून गॅरेजचालकाची ७७ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी खासगी सावकार वैभव देवरे, त्याची पत्नी सोनल हिच्यासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी सदाशिव बनगर पवार (रा. फडोळ मळा, अंबड, नाशिक) यांचे कामटवाडा येथे कामिनी ऑटोटेक नावाचे फोरव्हीलरचे गॅरेज व विल्होळी येथे शिवसाधना प्रा. लि. या नावाची क्रेन मॅन्युफॅक्चरिंगची स्वत:ची कंपनी आहे. फिर्यादी पवार यांना कंपनीच्या कामासाठी जमीन खरेदी करायची होती. त्यासाठी ते जागेच्या शोधात होते. सप्टेंबर २०१९ ते ऑक्टोबर २०२४ या दरम्यानच्या कालावधीत आरोपी गोविंद पांडुरंग ससाणे (कामटवाडा, नाशिक), वैभव यादवराव देवरे, सोनल वैभव देवरे (दोघेही रा. सीमा पार्क अपार्टमेंट, राणेनगर, चेतनानगर, नाशिक) व निखिल पवार (रा. स्वामी विवेकानंद पवार, सिडको) या चौघांनी संगनमत करून हिरावाडी येथील जमिनीची बनावट कागदपत्रे दाखवून ती खरी असल्याचे भासविले, तसेच गोविंद ससाणे यांच्या सारुळ येथील जमिनीचा व्यवहार अनेक लोकांसोबत केलेला असल्याचे माहीत असूनदेखील फिर्यादी पवार यांची फसवणूक करण्याचा कट या चौघा आरोपींनी रचला. त्यानंतर या दोन्ही जमिनींचा व्यवहार वैभव देवरे याने इतर साथीदारांच्या मदतीने करण्याचा ठरला. त्यावेळी सारुळ व हिरावाडी येथील जमीन खरेदीचा व्यवहार ठरला. त्यापोटी फिर्यादी पवार यांच्याकडून ६३ लाख ४९ हजार रुपये घेऊन त्यांची आर्थिक फसवणूक केली आहे, तसेच वैभव देवरे व निखिल पवार यांनी सावकारी व्यवसायाकरिता फिर्यादी पवार यांना बळजबरीने ऑनलाईन व रोखस्वरूपात असे एकूण ३५ लाख रुपये देण्यास भाग पाडले. त्यातील २० लाख रुपये हे परत करण्यासाठी फिर्यादी पवार यांनी वैभव देवरे याला विनंती केली असता त्याने हे पैसे परत देण्यास नकार देऊन त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी दिली, तसेच खासगी सावकार वैभव देवरेची पत्नी सोनल देवरे हिने फिर्यादी पवार यांना फोनवरून विनयभंगाची खोटी तक्रार करण्याची धमकी दिली. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गोविंद ससाणे, वैभव देवरे, सोनल देवरे व निखिल पवार यांच्याविरुद्ध फसवणुकीसह जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वकिलाची स्विफ्ट कार जाळली

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** घराजवळ उभी असलेली कार अज्ञात इसमाने पेट्रोलच्या सहाय्याने जाळून नुकसान केल्याची घटना बजरंगवाडी येथे घडली. फिर्यादी ॲड. पवन सोमनाथ भगत (रा. बजरंगवाडी, नाशिक–पुणे रोड) यांनी काल (दि. ३१) रात्रीच्या सुमारास राहत्या घराजवळ एमएच १५ एचजी ५७७८ या क्रमांकाची सुझुकी कंपनीची स्विफ्ट कार रस्त्यावर उभी केली होती. अज्ञात इसमाने मध्यरात्रीच्या सुमारास या कारवर पेट्रोल ओतून आग लावून नुकसान केले. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास म्हैसधुणे करीत आहेत.

## बस प्रवासात दोन तोळ्यांचे मंगळसूत्र लंपास

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** बस प्रवासादरम्यान महिलेच्या गळ्यातील दोन तोळे वजनाचे ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. फिर्यादी कमलेश शशिकांत देशमुख (रा. वृंदावननगर, आडगाव शिवार) हे त्यांच्या आईसह साक्री येथे गेले होते. ते नाशिकला येण्यासाठी एमएच १५ बीपी ४५१० या क्रमांकाच्या नंदुरबार ते नाशिक या बसमध्ये बसले होते. त्यादरम्यान फिर्यादी देशमुख यांच्या आईच्या गळ्यात असलेले हे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने चोरून नेले. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## साधूग्रामच्या अतिरिक्त जागेसाठी मेरीची १०० एकर जमिन विचाराधीन

### पालक सचिव एकनाथ डवले : सिंहस्थ आढावा बैठकीत महत्त्वपूर्ण चर्चा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** दोन वर्षांनी नाशिक नगरीत होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी तपोवनची जागा अपुरी ठरत असल्याने नवीन जागेचा शोध सुरु असून महाराष्ट्र इंजिनिअरींग रिसर्च इन्स्टिट्यूट (मेरी) या ठिकाणी १०० एकर जागा उपलब्ध असून त्याची देखील पाहणी करण्याचे निर्देश जिल्ह्याचे पालक सचिव एकनाथ डवले यांनी दिले.




नियोजन भवनात आयोजित बैठकीत जिल्ह्याचे पालक सचिव एकनाथ डवले यांनी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा आढावा घेतला. विभागीय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा पोलीस अधिक्षक विक्रम देशमाने, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

साधूग्राम हे कुंभमेळ्याच्या प्रमुख केंद्रांपैकी एक असून येथे संत, महात्मा त्यांचे खालसे आणि विविध धार्मिक प्रतिनिधींचे एकत्रीकरण होते. यामुळे साधूग्रामला अधिकाधिक जागा उपलब्ध करणे आवश्यक आहे. नाशिकमध्ये तीन प्रमुख आखाडे असून, त्यांचे खालसे निवासी साधू महंतांसाठी साधूग्रामची उभारणी केली जाते. यंदा साधूग्रामसाठी सुमारे ४०० एकर क्षेत्र प्रस्तावित आहे.

तथापि, नो डेव्हलपमेंट झोन असलेल्या या भागातील जमीन मिळण्यास उशीर झाल्यास, त्याचा परिणाम कुंभमेळ्यावर होऊ शकतो. या बाबींचा विचार करत, डवले यांनी साधूग्रामसाठी मेरीच्या जागेची चाचपणी करण्याचा प्रस्ताव मांडला. याठिकाणी १०० एकर जागा उपलब्ध असून, ही जागा शहराच्या लगत असल्याचे निर्देश डवले यांनी दिले. कुंभमेळ्याच्या आयोजनाच्या संदर्भात प्रशासनाने तयार केलेल्या आराखड्याचे अवलोकन करताना, डवले यांनी सांगितले की, केवळ कागदावर चित्र रंगवण्याऐवजी प्रत्यक्ष फिल्डवर काम होण्याची खरी गरज आहे. पायाभूत सुविधांचा विकास करत असताना, गर्दीवर नियंत्रण आणि व्यवस्थापन यावर विशेष लक्ष केंद्रित करूनच नियोजन करणे आवश्यक आहे. विशेषतः२००३ च्या घटनेचा संदर्भ देत डवले यांनी सांगितले की, या दुर्घटनेनंतर चौकशीसाठी नियुक्त केलेल्या व्ही. रमणी आयोगाच्या शिफारशींवर देखील अभ्यास करण्याचे आदेश त्यांनी दिले. यंदा सिंहस्थासाठी वेळ उपलब्ध आहे. आतापासूनच काम सुरू करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मागील कुंभमेळ्यात ब्रँडिंगला कमी पडले होते. यंदा मात्र, ब्रँडिंगमुळे गर्दी वाढण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने त्यादृष्टीने तयारी करण्याच्या (पान ६ वर)

## जिल्हाधिकारी जलज शर्मा, जि.प. सिईओ मित्तल यांचा उद्या सन्मान





**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** भगवान महावीर यांच्या जीवन चरित्रावर आधारीत 'राज्यस्तरीय निबंध स्पर्धा' महाराष्ट्र शासनाच्या भगवान महावीर स्वामी २५५० वा निर्वाण कल्याणक महोत्सव समितीच्या वतीने आयोजित केली होती. या स्पर्धेत संपूर्ण राज्यात नाशिक जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग हा सर्वाधिक होता. यासाठी जिल्हाधिकारी जलज शर्मा व मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांचा राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र सरकारतर्फे भगवान महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणकनिमित्त गठीत समितीतर्फे भगवान महावीर यांच्या जीवन चरित्रावर आधारीत 'राज्यस्तरीय निबंध स्पर्धा' आयोजित केली होती. या निबंध स्पर्धेत सर्वाधिक विद्यार्थी सहभागी जिल्हा श्रेणीमध्ये नाशिक जिल्ह्याचा प्रथम क्रमांक आला असून याबद्दल जिल्हाधिकारी जलज शर्मा व मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांचा राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते उद्या (दि.२) राजभवन, मुंबई येथे आयोजित गौरव समारंभात सन्मान करण्यात येणार आहे.

## तीन दिवसीय मिलेट महोत्सवाचे उद्घाटन संपन्न

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेअंतर्गत विविध महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. कृषि पणन मंडळाच्या विभागीय कार्यालय नाशिकमार्फत 'मिलेट महोत्सव–२०२५'चे उद्घाटन कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते संपन्न झाले.

'उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालय, के.बी.टी. इंजिनिअरींग कॉलेज जवळ, गंगापूर रोड, नाशिक येथे दि.३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत होत आहे यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणेचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे, कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय नाशिकचे उपसरव्यवस्थापक एस.वाय. पुरी, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.डी.भाकरे, मिसेस इंडिया इंटरनॅशनल डॉ. शुभदा जगदाळे, प्राचार्य विलास देशमुख आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या सुरूवातीला कृषी मंत्री ॲड. कोकाटे यांच्या हस्ते फित कापून तीन दिवसीय 'मिलेट महोत्सव– २०२५' उद्घाटन झाले. यावेळी महर्षी उदाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास त्यांनी माल्यार्पण केले. तत्पूर्वी कृषीमंत्री ॲड. कोकाटे यांनी तृणधान्य महोत्सवाच्या निमित्ताने तृणधान्यांपासून तयार करण्यात आलेल्या खाद्यपदार्थांच्या स्टॉलला भेट देत स्टॉल धारकांशी संवाद साधला.

यावेळी ॲड. कोकाटे म्हणाले की , तृणधान्यांमधील पोषणमुल्यांमुळे त्यांचे आहारातील आरोग्यविषयक महत्व लक्षात घेवून नागरिकांनी दैनंदिन आहारात तृणधान्यांचा समावेश वाढविणे आवश्यक आहे. तृणधान्याचे महत्त्व अधिक लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने तसेच जिल्हा व तालुकास्तरावर तृणधान्य उत्पादक शेतकऱ्यांना कायमस्वरूपी विक्री व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येईल. तसेच मिलेट महोत्सवासोबत जी कृषी प्रदर्शने जिल्ह्यासोबतच तालुका व गाव पातळीवर व्हावीत. तसेच या प्रदर्शनांची नागरिकांमध्ये माहिती होण्यासाठी जनजागृती करावी, असेही त्यांनी सांगितले. यावेळी उपसरव्यवस्थापक शपुरी व प्राचार्य डॉ.भाकरे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी ॲड. कोकाटे म्हणाले की मिलेट उत्पादन ,मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व या विषयी नामांकित तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने, चर्चासत्र, प्रश्नमंजुषा, अनुभव कथन असे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत.


> या 'मिलेट महोत्सव–२०२५' २ फेब्रुवारी २०२५ पर्यंत नागरिकांसाठी सुरू असणार आहे. या ठिकाणी तृणधान्यापासून तयार करण्यात आलेल्या विविध खाद्यपदार्थांचे ३० स्टॉल उभारण्यात आलेले आहे. यात नाशिकसह, सोलापूर, जळगाव, सातारा, नांदेड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, धुळे, पुणे जिल्ह्यातील समूह सहभागी झाले आहेत. ग्राहकांना ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर ही तृणधान्ये व यापासून तयार करण्यात येणारे पदार्थ तसेच ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली–मिक्स, भाकरवडी, शेवया, नुडल्स, आईस्क्रिम, खाकरे, शेव, चिवडा, रागीचा डोसा मिक्स इत्यादी नाविण्यपूर्ण अशी उत्पादने थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

## नवऱ्याने बायकोवर ज्वलनशील पदार्थ टाकून पेटवले

### महिला गंभीर जखमी

**सातपूर (भ्रमर प्रतिनिधी) :-** नवऱ्याने बायकोच्या अंगावर ज्वलनशील पदार्थ ओतून तिला पेटवून दिल्याची घडली आहे.


याबाबत अधिक माहिती अशी की, काल सकाळी श्रमिकनगर येथील सातमाऊली चौक परिसरात राहणाऱ्या इसमाने दारूच्या नशेत बायकोवर ज्वलनशील पदार्थ ओतून तिला पेटवून दिले. ही घटना शेजाऱ्यांना समजाच त्यांनी तात्काळ पेटलेल्या महिलेच्या अंगावर पाणी ओतून आग विझवली. परंतु तोपर्यंत ही महिला ४० टक्के भाजून गंभीर जखमी झाली आहे. या महिलेला उपचारासाठी शेजाऱ्यांनी तात्काळ जिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे. सातपूर पोलीस पुढील तपास करीत आहेत. या प्रकरणी पतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## मनपा आयुक्त खत्री यांनी केली बाळासाहेब ठाकरे इतिहास संग्रहालयाची पाहणी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री यांनी गंगापूर रोड येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे इतिहास संग्रहालय व उद्यान विषयक कामांची पाहणी केली. महापालिकेच्या अखत्यारीत सुमारे ७.५ एकर जागेवर हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकारला जात असून, त्यामध्ये नाशिककर नागरीकांसाठी विविध आधुनिक सुविधा विकसित केल्या जात आहेत.

या प्रकल्पात ॲडव्हेंचर पार्क, ॲम्पी थिएटर, ई–लायब्ररी, अभ्यासिका, महिलांसाठी आधुनिक प्रशिक्षण केंद्र, बहुउद्देशीय हॉल, लँडस्केपिंग आणि कारंज्यांसह अत्याधुनिक उद्यान विकसित करण्याचे काम सुरू आहे. विशेषतः नाशिकमधील सर्वात मोठे ॲडव्हेंचर पार्क याठिकाणी उभारले जात आहे. सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर नाशिककर नागरीकांच्या मनोरंजनासाठी तसेच पर्यटनासाठी एक हक्काचे ठिकाण निर्माण होणार असून आबाल वृध्द तसेच तरुणाई वर्गासाठी वेगवेगळया प्रकारच्या (पान ६ वर)




## राशीभविष्य

- **मेष** : ताप, आम्लपित्ताबाबत काळजी घ्यावी. खेळाडू, कलाकारांना संधी लाभतील. प्रवासात काळजी घ्या.
- **वृषभ** : नोकरी-व्यवसायात मनाजोगी प्रगती होईल. प्राप्तीचं प्रमाण वाढेल. स्पर्धांमध्ये उत्तम यश मिळेल.
- **मिथुन** : महत्त्वाची कामं होतील. पूर्वीच्या गुंतवणुकीतून लाभ होईल. नोकरीच्या अपेक्षित संधी लाभतील.
- **कर्क** : व्यवसायात अधिक प्राप्ती होईल. सरकारी कामं मार्गी लागतील. यंत्र, उपकरणं जपून हाताळावीत.
- **सिंह** : व्यवसायात नैराश्य वाटू लागेल. व्यवसायात मोठं यश मिळेल. सहल, करमणूक आदींचा लाभ होईल.
- **कन्या** : अपेक्षित सुवार्ता कानी येईल. मित्रमंडळींकडून उत्तम लाभ होईल. प्रवासात प्रकृतीस त्रास संभवतो.
- **तूळ** : व्यावसायिक येणी वसूल होतील. विवाहाच्या प्रयत्नातील विलंब दूर होईल. लहान मुलांची चिंता राहील.
- **वृश्चिक** : मुलाखतींमध्ये उत्तम यश मिळेल. व्यावसायिक कर्जाची परतफेड होईल. नातेवाईकांचा रोष संभवतो.
- **धनु** : व्यावसायिक कामांचा वेग वाढेल. कौटुंबिक बाबतीत सुवार्ता कानी येईल. मुलांचा उत्कर्ष साधू शकाल.
- **मकर** : अचानक धनलाभाचे योग आहेत. खेळाडू, कलावंतांना उत्तम लाभ होईल. पतप्रतिष्ठेत वाढ होईल.
- **कुंभ** : व्यवसायात मोठी गुंतवणूक होऊ शकेल. परिचयोत्तर विवाहाच्या संधी लाभतील. बाकी चिंता नसावी.
- **मीन** : प्रेम प्रकरणात मतभेद संभवतात. नोकरीत विरोधाला सामोरं जावं लागेल. विचारानं रहायला हवं.

## सल्ला मोलाचा
## गेट रेडी फॉर किटी पार्टी

घरी किटी पार्टी असेल तर तयारी कशी करावी हे लक्षात येत नाही. सजावटीबरोबरच पार्टीमधल्या मेन्यूचंही प्लॅनिंग करुन ठेवावं. ही तयारी करता करता त्या दिवशी घालण्याच्या ड्रेसचा विचार करुन ठेवा. पार्टीमध्ये उठून दिसावं यासाठी काय करावं असा प्रश्न कोणाला पडला असेल तर बिचकू नका. काही उपायानं चेहऱ्याला त्वरित टवटवी मिळते. आपण पीठ मळतो त्याप्रमाणे केळी मळावीत आणि १०-१५ मिनिटं फ्रीजरमध्ये ठेवावं. १५ मिनिटांनी फ्रीजरमध्ये ठेवलेला केळ्याचा पॅक चेहरा आणि मानेवर १० मिनिटं लावून ठेवून टाकावा. बटाटे कापल्यावर त्यातून येणारा रस हातांवर लावावा. किचनमध्ये स्वयंपाक करताना हात चिकट आणि हळदीने भरलेले असतात. असं झालं तर तेथे बटाट्याचा रस कामी येतो. या रसामुळे हातांचा चिकटपणा जाण्यास मदत होते. सध्याचे दिवस थंडीचे आहेत. या दिवसात तुम्ही ब्लॅक लेगिंगबरोबर कोणत्याही गडद रंगाचा टॉप आणि स्वेटर तसेच स्टोलचा वापर करु शकता. चेहऱ्याला हलका मेकअप चांगला दिसतो. कीटी पार्टी असेल तेव्हा या छोट्या पण महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

## दिनविशेष
## १ फेब्रुवारी

१९४२ : नार्वेमध्ये क्विस्लिंग याने जर्मनांच्या हातचं बाहुलं असणारं सरकार स्थापन केलं.
१९६४ : 'युनिट ट्रस्ट'ची स्थापना.
१९८६ : सुप्रसिद्ध अभिनेता बापूराव माने यांचे निधन.
२००३ : अंतराळवीर कल्पना चावलाचा मृत्यू.
२०१३ : महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी कायद्यात बदल करून तो सक्षम करण्याच्या वटहुकमाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

## महत्त्वपूर्ण काही...
## द्रव स्फटिकांबाबतचं संशोधन

अमेरिकेतील आरसीए लॅबोरेटरीतील संशोधक रिचर्ड विल्यम्स यांनी १९६० च्या दशकात केलेल्या संशोधनात एक महत्त्वपूर्ण निष्कर्ष समोर आला. त्यानुसार द्रव स्फटिकांची दिशा ही त्यावर दिलेल्या विद्युतक्षेत्राच्या तीव्रतेनुसार बदलत असल्याचं आढळलं. या महत्त्वपूर्ण संशोधनामुळे आधीच ध्रुवीत असलेला प्रकाश या द्रव स्फटिकातून पाठवल्यास त्या स्फटिकांच्या दिशेनुसार प्रकाशाची तीव्रता बदलणं शक्य होणार होतं. म्हणजेच विद्युतक्षेत्राची तीव्रता कमी-अधिक करून प्रकाशाच्या ठिपक्यांची तीव्रता कमी-अधिक करणं शक्य होणार होतं. मात्र, यासाठी द्रव स्फटिकांचं तापमान उच्च ठेवावं लागत होतं. या संदर्भात विल्यम्स यांचे सहकारी जॉर्ज हाइलमायर यांनी महत्त्वाचं संशोधन केलं. त्यांनी नेहमीच्या तापमानाला वापरता येतील अशा द्रव स्फटिकांची निर्मिती केली. परिणामी यानंतरच्या काही काळातच कॅल्क्युलेटरवर या द्रव स्फटिकांचे पडदे दिसू लागले. पुढे कालांतराने संगणक आणि चित्रवाणीतील कॅथोड रे ट्युबची जागाही द्रव स्फटिकांवर आधारलेल्या, वीज वाचवणाऱ्या आणि कमी जाडीच्या द्रव स्फटिकांच्या पडद्यांनी घेतली.

## आरोग्यमंत्र
## सडपातळ बांधा असुनही...

वाढत्या वजनामुळे अनेक विकारांना निमंत्रण मिळतं. त्यामुळे स्लीम असणं महत्त्वाचं असा अनेकांचा समज आहे. तो खरा असला तरी स्लीम व्यक्तिंनी कसाही आहार घेतल्यास, व्यायामाकडे दुर्लक्ष केल्यास फारसं बिघडत नाही, हा समज मात्र चुकीचा आहे. सडपातळ बांधा हे निरोगी असण्याचं लक्षण असतंच असं नाही. बारीक माणसांमध्येही आरोग्यविषयक समस्या उद्‌भवू शकतात.



✻ बारीक माणसांच्या शरीरात चरबीचं प्रमाण जास्त असू शकतं. बाहेरून बारीक दिसत असले तरी त्यांच्या शरीराच्या आतल्या भागात चरबी साठत जाते. विविध अवयवांच्या भोवती तसंच त्वचेच्या खालच्या भागात चरबी साठू लागते. स्थूल लोकांच्या तुलनेत बारीक माणसांच्या शरीरात या चरबीचं प्रमाण जास्त असतं.

✻ चुकीच्या जीवनशैलीमुळे बारीक लोकांना मधुमेह जडण्याची शक्यता जास्त असते. या लोकांनीही आहारावर नियंत्रण ठेवायला हवं.

✻ जाड किंवा निरोगी लोकांच्या तुलनेत बारीक लोक जास्त आळशी असू शकतात. बैठी जीवनशैली आणि जंक फूडचं अतिसेवन याला कारणीभूत ठरतं. जंक फूडचा त्रास होणार नाही हा समज चुकीचा आहे.

✻ बारीक लोकांच्या शरीरात अन्नातले पोषक घटक कमी प्रमाणात शोषले जातात. यामुळे चयापचयाची क्रिया मंदावते. यामुळे हृदयविकार आणि मधुमेहासारखे विकार होण्याची शक्यता वाढते.

✻ बारीक लोकांची प्रतिकारशक्ती इतरांच्या तुलनेत कमी असते. त्यामुळे बारीक म्हणजे निरोगी हा समज काढून टाकावा.

## पंचांग

**शनिवार, १ फेब्रुवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
माघ शु. ३, नक्षत्र : पू. भाद्रपदा
चंद्रराशी : कुंभ , परिघ योग,
सूर्योदय : ७.१२, सूर्यास्त : ६.३१

## फॉरवर्डस

मनातल्या गोष्टी कवितेतून ओठांवर येतात तेव्हा...

**हम जिसे छिपाते है उम्रभर, बात बोल देती है।**
**शायरी भी क्या गजब होती है, हर राज खोल देती है।**

## वाचा तर खरं

आजकाल महागाईच्या जमान्यात बचतीचं महत्त्व आणखी वाढलं आहे. आपण बचतीसाठी अनेक प्रकारचं नियोजन करतो. पण केलेल्या नियोजनाची यशस्वी अंमलबजावणी होतेच असं नाही. मॉलमध्ये गेल्यावर तर जणू शॉपिंगचं व्यसन लागल्यासारखं वाटून जातं. काय खरेदी करावं याचं भान न राहिल्याने अनावश्यक वस्तूंची खरेदी केली जाते. मानसशास्त्रज्ञांनी खरेदीच्या या व्यसनावर उपाय सांगितला. तो म्हणजे नेहमी भरल्या पोटी खरेदीला जावं. उपाशीपोटी खरेदीला जाऊ नये. उपाशी असताना मनाची अवस्था संतुलित नसते. अशा वेळी अनावश्यक खरेदीचा धोका बळावतो.

## रोजगारवाटा
## व्यवसाय सुरू करताना...

दोस्तांनो, सद्यस्थितीत नोकरीच्या क्षेत्रातील स्पर्धा बरीच वाढली आहे. शिवाय या क्षेत्रात आवश्यक त्या प्रमाणात संधी उपलब्ध होत नाही. या तसंच अन्य काही कारणांमुळे आजकाल स्वतंत्र व्यवसायाकडील कल वाढला आहे. मात्र व्यवसायाचा पाया रचताना काही चुका होऊ शकतात. म्हणूनच व्यवसाय सुरू करताना नेमकं काय करायला हवं याविषयी...

✻ बरेच जण आपल्या उत्पादनाचं मार्केटिंग करत नाहीत. मात्र मार्केटिंगवर पैसे वाचवल्यामुळे तुमची प्रसिद्धी होऊ शकत नाही. सुरूवातीच्या टप्प्यात एकूण उत्पन्नाच्या १० ते २० टक्के रक्कम मार्केटिंगवर खर्च करायला हवी. थोडं सुस्थापित झाल्यावर हा खर्च पाच ते दहा टक्क्यांवर आणता येईल.




✻ उद्योजकांची टीम चांगली हवी. चुकीच्या लोकांची निवड केल्यामुळे तुमचं बरंच नुकसान होऊ शकतं. त्यामुळे गुणवान, कुशल आणि कल्पन लोकांची निवड करा. यामुळे तुमच्या व्यवसाय वृद्धीला गती मिळू शकेल.

✻ बरेच पण 'परफेक्शन'च्या मागे लागतात. एखादं ॲप तयार करताना बराच वेळ घालवतात. त्याऐवजी आपल्या उत्पादनाची गुणवत्ता सुधारण्यावर भर द्यायला हवा. उत्पादनाची गुणवत्ता सुधारली की तुमचं उत्पादन लोकप्रिय होईल.

## खेचाखेची
## अशीही घाई

एकदा एक माणूस बसमध्ये उभा होता. त्या स्थितीत तो वारंवार आपल्या हातातील घड्याळाकडे पहात होता. बसमध्ये चार-पाच बाकं मोकळी असताना हा प्रवासी उभं राहून प्रवास करत असल्याचं पाहून कंडक्टर जवळ आला आणि म्हणाला, 'अहो, आपण उभे का? मोकळ्या सीटवर बसून घ्या ना?'
त्यावर प्रवासी म्हणाला, 'माझ्याकडे बसायला अजिबात वेळ नाही. लवकर जायचं आहे.'

## जीके टेस्ट

कोणी कलंदर चित्रांच्या माध्यमातून आपल्याला दिसलेला निसर्ग दाखवण्याचा प्रयत्न करतो. झारिया फोरमन या चित्रकर्तीनं ग्रीनलँडमधील एक नितांतसुंदर स्थळ आपल्या चित्रातून दाखवलं आहे. भटकंतीचं वेड असलेली ही चित्रकर्ती देशोदेशीच्या दुर्गम भागांमध्ये फिरते आणि तेथील अनोखा नजारा छायाचित्रीत करते. स्वस्थळी परतल्यावर त्यातील भावलेली छायाचित्र रंगांच्या सहाय्यानं रेखाटण्याचा तिचा प्रयत्न असतो. यासाठी ती कोणत्याही प्रकारच्या ब्रशचा अथवा अन्य उपकरणांचा आधार घेत नाही. केवळ रंग आणि बोटांच्या सहाय्यानं तिची ही चित्रसाधना सुरू असते.

## रूचिरा
## शेंगोळेची रूचकर डिश


कोणत्याही पदार्थाची रूची वाढवण्यासाठी त्या वैविध्य आणणं गरजेचं ठरतं. त्यादृष्टीने आज शेंगोळे ही रूचकर डिश कशी बनवायची ते जाणून घेऊ...

**साहित्य** : एक वाटी गव्हाचं पीठ, अर्धी वाटी ज्वारीचं पीठ, पाव वाटी डाळीचं पीठ, एक चिरलेला कांदा, तीन चमचे आलं-लसूण पेस्ट, दोन चमचे तिखट, एक चमचा हळद, चिमुटभर हिंग, मोहरी, तीन चमचे तेल, कोथिंबीर, एक चमचा गरम मसाला इत्यादी.



**कृती** : सर्वप्रथम तीनही पीठं एकत्र करा. त्यात आलं-लसूण पेस्ट, हळद, तिखट, मीठ, कोथिंबीर तेल घाला. आता त्यात पाणी घालून घट्ट कणीक भिजवून घ्या. त्यानंतर कणकेच्या छोट्या गोळ्याला नळीसारखा लांबट आकार देऊन कडबोळ्यासारखं वळवा. अशा प्रकारे सगळे शेंगोळे तयार करुन घ्या. दुसरीकडे, पॅनमध्ये तेल, मोहरी, कांदा-लसूण, जिरे घाला. तिखट, हळद, मीठ घालून दोन ग्लास पाणी घाला. पाण्याला उकळी आली की त्यात शेंगोळे सोडा. आता त्यात गरम मसाला घाला. पंधरा मिनिटं मंद आचेवर शिजू द्या. शेंगाळे शिजलं की वर तरंगू लागतात. यावेळी गॅस बंद करा. आता चिरलेली कोथिंबीर घालून डिश सजवा.

## शब्दकोडे क्रमांक १८६८



**आडवे शब्द :-**
१) ताजमहालाचा दगड
५) सरसनीरस, बरेवाईट
८) शरीर
१०) शिळाच्या विरुद्ध
११) नगरपलिकेचा अध्यक्ष
१३) सटरफटर, किरकोळ सामान
१५) दुर्दशा
१७) अंधार
१८) बेचव
२०) जन्म
२२) ढीग
२४) पायदळाचा शिपाई
२६) मनाचे श्लोक लिहिणारे
२९) झकास
३०) व्यायाम
३२) पुन्हा
३४) राज्ञी
३६) अनुमती
३९) पोत्याचे कापड
४१) जननी
४२) गुणाकारच्या विरुद्ध
४४) बारा वर्षाचा काळ
४६) धातूचा धागा
४७) रात्रभर
४९) बाजेची सुती पट्टी
५१) विनाकारण
५२) मत देण्याची क्रिया
५४) कौरव पांडवांची कथा
५६) गरळ ओकणारा सरपटी प्राणी
५७) विविध
५९) सूर्याचे एक नाव
६०) डोंगर
६१) शूर पुरुष
६३) अशुभ सावली
६४) मान, प्रतिष्ठा
६६) बशीचा जोडीदार
६८) चित्रपटाचा पडदा
७०) रत्न
७२) माफ
७४) युद्धात आलेले मरण
७६) वर्तुळ
७७) लोकनाट्य
७८) ✻✻✻ निर्यात
७९) स्तुती

**उभे शब्द :-**
१) राग उत्पन्न करणारा
२) गणपतीचे एक नाव
३) इंग्रजीत एक
४) रक्त(ग्रा)
५) उद्देश, जे साधावयाचे ते
६) असुर
७) धोबी
८) कोल्हापुरची महालक्ष्मी
९) हत्ती
१२) वंदनाचा एक शब्द
१४) पोपट
१६) अरण्यातील वाट
१९) दुसऱ्याच्या कबजातील
२१) अर्जुनाचे एक नाव
२३) सद्वर्तन
२५) उणीव, न्यूनता
२७) अभिप्राय
२८) भूपती
३१) वाकबगार
३३) निमग्न
३५) दोरा
३६) उद्याच्या नंतरचा दिवस
३७) बातमी
३८) कवी
४०) फळाचे साल
४१) विश्राम
४२) हिंदुस्थान
४३) अरण्य
४५) पुन्हा पुन्हा
४८) सामन्यातील पराक्रमी खेळाडू
५०) दारूचा एक प्रकार
५१) श्रद्धा नसलेला
५३) गुलामी
५५) फुलाची माळ
५७) बाई
५८) प्रफुल्लित
६१) प्रणयलीलेत नखाने काढलेला ओरखडा
६२) रात्र
६३) सर्प
६५) किंमत
६७) पळून जाणे
६९) जेवायला बसलेल्यांची रांग
७१) वधू
७३) आईचा भाऊ
७५) नदीचा काठ

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलच्या प्रादेशिक परिषद सदस्यपदी चांडक


**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** येथील सीए पियूष चांडक यांची भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल (महाराष्ट्र, गोवा आणि गुजरात) (WIRC) या सनदी लेखापाल नियामक मंडळाच्या प्रादेशिक परिषद सदस्यपदी निवड झाली आहे. वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल हे देशातील सर्वात मोठे रिजनल कौन्सिल आहे ज्यामध्ये १.४० लाखहून अधिक सीए व २.५० लाखाहून अधिक सीए विद्यार्थी आहेत. वेस्टर्न रिजनच्या निवडणुकीत एकूण ४८ उमेदवार होते आणि त्यापैकी २१ जणांची निवड होणार होती. नाशिकचे सीए पियूष चांडक हे मताधिक्याने कोटा पूर्ण करत उल्लेखनीय कामगिरी करत छोट्या शाखांसाठी आदर्श ठरले. विशेषतः नाशिक शाखेकडून त्यांना प्रचंड पाठिंबा मिळाला, जो त्यांच्या यशामध्ये महत्वाचा ठरला. तसेच वेस्टर्न रिजन मधील ३६ शाखांमधून त्यांना प्रचंड पाठिंबा मिळाला आहे.



त्यांनी यापूर्वीही तीन वर्षांपूर्वी या निवडणुकीत उल्लेखनीय यश संपादन केले होते. मागील तीन वर्षांत त्यांनी वेस्टर्न रिजनचे खजिनदारपद आणि विद्यार्थी परिषदेचे अध्यक्षपद भूषविले असून, या काळात उल्लेखनीय काम केले आहे, अशी माहिती नाशिक शाखेचे अध्यक्ष संजीवन तांबुलवाडीकर यांनी दिली.

## कौस्तुभ भामरेचा गौरव

**देवळा (भ्रमर वार्ताहर):-** युथ गेम कौन्सिल इंडिया यांच्यातर्फे झालेल्या १४ वर्ष वयोगटातील क्रिकेट खेळात येथील कौस्तुभ देवा भामरे याने संघनायक म्हणून यशस्वी भूमिका पार पाडत प्रथम पारितोषिक मिळवून दिले.




गोवा (म्हापसा) येथे नुकत्याच झालेल्या स्पर्धेत त्याने महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व केले. फेब्रुवारी २०२५ मध्ये नेपाळ येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी यामुळे त्याला मिळाली आहे. नाशिक येथील उदोजी होरायझन स्कूलमध्ये तो शिक्षण घेत आहे. क्रीडा शिक्षक अमोल शेटे, प्रिया भावसार, प्राचार्या नेहा सोनवणे यांचे त्याला मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

सभी शुभअंक संख्याशास्त्र और ज्योतिषशास्त्र पर आधारित है।
शनिवार
१/२/२०२५
कल्याण शुभअंक

| | | |
|---|---|---|
| ५ | ७ | ९ |
| ३५७ | ३४० | ५५९ |
| ६९० | ८९० | १८० |
| ५७ | ७३ | ९५ |
| ५९ | ७५ | ९७ |

## छोटी जाहिरात

### ज्योतिष

ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र व जन्मकुंडलीप्रमाणे. श्री प्रभूज्योतिष ऋषी. **संपर्क : काश्यपी फ, मामा मुंगी कार्यालयामागे, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक. मो. नं. ७५०७००६३८६.**

**वाचकांना सूचना :-** भ्रमर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्याची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल भ्रमर वृत्तपत्र जबाबदार राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

# कर्मवीर रावसाहेब थोरात महाविद्यालयात रंगली कवितेची मैफल



**वणी (भ्रमर वार्ताहर):–** 'अज्ञानाच्या काळोखात त्यांनी हाती घेतली मशाल क्रांतीची वाटेवरती असलेले काटे तुडविले गोष्ट निराळीच होती सावित्रीची' या तनिष्का पेंढारीची कविता काव्य संमेलनात क्रांतिज्योती सावित्रीबी फुले यांच्या योगदानाचा गौरव करणारी कविता भाव खाऊन गेली. निमित्त होते. मराठा विद्या प्रसारक समाजाचे कर्मवीर रावसाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वणी, महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या काव्यमैफिलीचे.

महाविद्यालयात काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एकसे बढकर एक अशा ३५ कवींच्या कवितांनी काव्य मैफिलीत रंग भरला. सामाजिक, प्रेम, आई, पंढरीचा विठ्ठल, शेतकऱ्यांचे दुःख, आत्महत्या, जागतिकीकरण, सरकार, लोकशाही, स्त्रियांचे प्रश्न या सारख्या अनेक प्रश्नांना कवींनी आपल्या कवितांद्वारे वाचा फोडली. स्वरचित आणि इतर कवींच्या कवितेचे वाचन या निमित्ताने करण्यात आले.

'आठवते मला माझ्या शाळेच्या दप्तरासाठी ती पूर्ण दिवस दुसऱ्याच्या शेतात राबली होती ती म्हणजे माझी आई होती.'

या मोहन भरसठच्या कवितेने आईच्या दुःखाची आर्त कहाणी रसिकांसमोर उलगडून दाखवली.

'आयुष्य जगणे एक कला आहे कसं जगायचे हे ज्याचे त्याने ठरवायचे असते ...'

या प्रीती बागूलच्या कवितेने आयुष्याचे सुंदर विवेचन विचार करायला लावणारे होते.

मी कुठे म्हणालो परी मिळावी, फक्त जरा बरी मिळावी ..

ही मंगेश पाडगावकरांची कविता साहिल गागुर्डे याने फार सुंदर पद्धतीने सादर केली. वेगवेगळ्या विषयांवर ३५ कवींनी यावेळेस आपल्या कविता सादर केल्या. महाविद्यालयातील प्राध्यापकांनीही या मैफलीत सहभाग घेऊन कविता वाचन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन.शिदे होते. उपप्राचार्य डॉ. वाय. एम. साळुंके यांनी वार्षिक स्नेहसंमेलन घेण्यामागची भूमिका स्पष्ट केली. स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. पी. एम. कांबळे यांनी वार्षिक स्नेहसंमेलन निमित्ताने होणाऱ्या वेगवेगळ्या स्पर्धांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. स्पर्धेचे परीक्षण डॉ. के. आर. आढाव व प्रा. योगेश मोहन यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. कैलास सलादे यांनी केले. आभार प्रा. महेंद्र गायकवाड यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. निकिता खांदवे, प्रा.सचिन लोखंडे, प्रा. आर. टी. आहिरे, प्रा.किरण डेरे, प्रा.भारती ठाकरे, प्रा.उमेश देशमुख, प्रा.रवींद्र इंद्रीकर, गांगुर्डे यांनी सहकार्य केले.

# जि. प. अध्यक्ष चषक तालुकास्तरीय स्पर्धा येवल्यात उत्साहात



**येवला (भ्रमर वार्ताहर) :–** जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धा डी पॉल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. स्पर्धेचे उद्घाटन गटविकास अधिकारी संदीप वायाळ यांच्या हस्ते झाले.

गटशिक्षणाधिकारी संजय कुसाळकर, विस्तार अधिकारी मनीषा बाकचौरे, सुनील मारवाडी, डी पॉल शाळेचे प्राचार्य अबेय वर्गीसे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. प्रास्ताविकात गटशिक्षणाधिकारी संजय कुसाळकर यांनी या स्पर्धेची संकल्पना व महत्त्व विशद केले.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी विविध क्रीडा व कला प्रकार तसेच स्पेलिंग बी, मॅथ बी यासारख्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तर द्वितीय दिवशी सांस्कृतिक प्रकारांतर्गत गीतगायन, नृत्य या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी येवला तालुक्यातील सहा बीटातील स्पर्धक सहभागी झाले होते. या सर्वांमधून रंजक व चुरशीच्या सामन्यातून जिल्हास्तरासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. तसेच यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या देखील स्पर्धा संपन्न झाल्या. स्पर्धकांच्या कला व क्रीडा कौशल्याने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी स्पर्धेतील प्रत्येक प्रकारातील प्रथम तीन क्रमांकांना कापसे पैठणी उद्योग समूह येवला यांच्या सौजन्याने आकर्षक सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभ उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे, माजी नगराध्यक्ष बंडू क्षीरसागर, पंचायत समितीचे माजी सभापती प्रवीण गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. विस्तार अधिकारी मनीषा वाकचौरे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. स्पर्धा यशस्वीतेसाठी तज्ज्ञ परीक्षक, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक आणि शिक्षक संघटना प्रतिनिधींनी परिश्रम घेतले.

# संस्कृती जतन करण्यात न्या. रानडे यांचे मोठे योगदान : डॉ. तारा पाटील




**निफाड (भ्रमर वार्ताहर) :–** ज्या काळी मराठी भाषा मागे पडत होती त्या काळात मराठी भाषेचे जतन करण्यासाठी आणि आपली संस्कृती जतन करण्यासाठी न्यायमूर्ती रानडे यांनी प्रचंड प्रयत्न केले, असे प्रतिपादन न्या. रानडे विचारांच्या अभ्यासक डॉ. तारा पाटील यांनी केले.

न्या. रानडे यांची जयंती आणि वैनतेय विद्यालयाच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने आयोजित न्या. रानडे यांचे जीवन व कार्य या विषयावर व्याख्यान देताना डॉ. पाटील या बोलत होत्या.

डॉ. पाटील आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या, की जुन्या काळात पदवीधर विद्यार्थी दारिद्र्य, कठीण अभ्यास व इतर कारणामुळे अतीतणावाने आत्महत्या करायचे. ही गोष्ट न्या. रानडे यांनी निदर्शनास आणून दिली. त्यावर त्यांनी प्रबोधन केले. ते दूरदृष्टीचे होते. लोकसंख्या वाढीवरही त्यांनी व्याख्याने दिली. जनतेने आपली संपत्ती उद्योगधंद्यात लावावी. त्यामुळे देशाच्या अर्थकारणाला चालना मिळेल, असे त्यांचे विचार होते. पाटील यांनी आपल्या व्याख्यानात उपस्थित विद्यार्थ्यांना न्या. रानडे यांचे बालपण, शालेय जीवन, त्यांच्या अभ्यासाची पद्धत, खेळण्याची पद्धत व इतर माहिती सांगितली. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष रतन पाटील वड्घुले, न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, विश्वस्त ॲड. दिलीप वाघवकर, मधुकर राऊत, विश्वास कराड, प्राचार्य बी. आर. सोनवणे, पर्यवेक्षक गुलाब टकले, बी. बी. गुंजाळ, प्राचार्या पल्लवी सानप, माजी प्राचार्य एम. एस. माळी आदी उपस्थित होते. प्रास्ताविक वि. दा. व्यवहारे यांनी केले.

याप्रसंगी या कार्यक्रमाचे अध्यक्ष रतन पाटील वड्घुले यांचे भाषण झाले. सूत्रसंचालन एस. जे. चौधरी यांनी केले. आभार प्रदर्शन प्राचार्य बी. आर. सोनवणे यांनी केले.




आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमात प्रात्यक्षिक दाखवताना योगेंद्र पाटील. समवेत प्राचार्य डॉ. हितेंद्र आहेर, उपप्राचार्य व रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. डी. के. आहेर, आपत्ती व्यवस्थापन कक्ष प्रमुख डॉ. सतीश ठाकरे आदी.

# सहकार भारतीची नूतन शहर कार्यकारिणी जाहीर



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** रुंग्ठा हायस्कूल सभागृह येथे सहकार भारती नाशिक शहर नूतन कार्यकारिणी निवड सभा संपन्न झाली. या कार्यकारिणीमध्ये नाशिक एज्युकेशन क्रेडीट सोसायटीचे सेक्रेटरी साहेबराव पवार यांची सहकार भारती नाशिक शहर कार्यकारिणीच्या सहसचिवपदी निवड करण्यात आली.

या निवडीबद्दल सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.डॉ.उदय जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या निवडीप्रसंगी पूर्व राष्ट्रीय संघटनमंत्री विष्णू बोबडे, प्रदेश संघटनमंत्री शरद जाधव,नाशिक शहर अध्यक्ष डॉ. प्रशांत पुरदरे, नाशिक ग्रामीण जिल्हा अध्यक्ष नारायणशेठ वाजे, माजी अध्यक्ष परमानंद गुजराथी, प्रदेश उपाध्यक्ष अजय ब्रह्मेचा, सेक्रेटरी शिरीष भालेराव, डॉ.दत्तात्रय गुजराथी, मधुकर फटांगरे, दिपक पंढरपूरकर, धनंजय पोतदार, बन्सीलाल अंदोरे,राजेंद्र पवार, चारुदत्त वैद्य, प्रमोद देशपांडे, सुधीर पगार, सुनील बच्छाव,नईम शेख, धर्मराज महाजन, संजय सूर्यवंशी, रत्नाकर बकरे, मधुकर हिंगमिरे आदी उपस्थित होते.

या निवडीबद्दल नाशिक एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा.दिलीप फडके संस्था उपाध्यक्ष चंद्रशेखर मोंढे, जयदीप वैशंपायन, विश्वस्त डॉ. सुधीर कुलकर्णी, माजी नगरसेवक राहुल दिवे,नामको बँकेचे जनसंपर्क संचालक प्रशांत दिवे, डॉ. विजय घाटगे, डॉ. एच. जी. व्होरा, डॉ. प्रसाद निकम, डॉ. श्याम पाटील, माजी पोलीस उपअधीक्षक दिलीप पगारे, माजी नगरसेविका आशा तडवी, ना. ए. सो. कार्यवाह राजेंद्र निकम, कार्यकारणी सदस्य सरोजिनी तारापूरकर, रंजना परदेशी, सहकार्यवाह शैलेश पाटोळे, उमेश कुलकर्णी, पंढरीनाथ बिरारी, पेठे हायस्कूलचे मुख्याध्यापक भास्कर कर्डिले, उपमुख्याध्यापक शरद शेळके, पर्यवेक्षक विजय मापारी, प्रा.दिलीप अहिरे, शिक्षक नेते के. के. आहिरे, अविनाश कोठावदे, पी.के. गायकवाड, शांताराम देवरे, राजेंद्र खुटाडे, दिनेश देवरे, डॉ. अजय पाटील, डॉ. मंगेश जाधव, महेश अहिरे, सुधाकर देशमुख, सुनील पुरकर, जिभाऊ पवार, जितेंद्र उगावकर, प्रवीण नवले, मनीष डांगे, हेमंत जाधव, हिरामण रेवर, विजय कन्नन, रमेश पवार आदींनी अभिनंदन केले.



स्वस्त धान्य दुकानदारांना येणाऱ्या अडचणीबाबतचे निवेदन जिल्हा पुरवठाधिकारी यांना देताना निवृत्ती कापसे , माधव गायधनी, दिलीप नवले, बाळासाहेब रायते, प्रभाकर मुळाणे, बापू आहेर, बाजीराव जगताप, मोसीन शेख, चेतन घोलप व इतर दुकानदार.

# स्टफिंग परवानग्या लवकरच नाशिकला देणार : कस्टम आयुक्त के. सी. जॉनी




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** कस्टम विभागाच्या कामाची पद्धतही साधी व सोपी करण्यात आली असून व्यापारी उद्योजकांना सर्व कुठलीही अडचण येऊ नये त्यासाठी सर्व प्रयत्न सुरु आहेत. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त सकारात्मक असून समस्या व अडचणी तातडीने सोडविण्यात येतील. सद्यस्थितीत एक महिन्यासाठी स्टफिंगसाठी २४ तास सेवा देण्यास अधिकाऱ्यांना सांगितले.

हॉलकॉन व आयसीडीत येथे पायाभूत सुविधा वाढविण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच स्टफिंग परवानग्या लवकर व नाशिक येथे देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करू, असे आश्वासन मुख्य कस्टम आयुक्त के. सी. जॉनी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या शिष्टमंडळाला दिले. नाशिकमधून कृषीमाल निर्यातीच्या दृष्टीने स्टफिंग परवानग्या लवकर मिळणे आवश्यक असून त्या नाशिक येथे देण्यात याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र चेंबरचे मुंबई विभागाचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, कृषी व ग्रामविकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे, पोर्टस ॲण्ड लॉजिस्टिक डेव्हलपमेंट समितीचे चेअरमन सी. एस. सिंग यांनी निवेदनाद्वारे केली.

सुरुवातीला मुख्य कस्टम आयुक्त के. सी. जॉनी, आयुक्त अविनाश थेटे, महाराष्ट्र चेंबरचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, कृषी व ग्रामविकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे, पोर्टस ॲण्ड लॉजिस्टिक डेव्हलपमेंट समितीचे चेअरमन सी. एस. सिंग यांनी पुष्पगुच्छ, शाल, टोपी देऊन सत्कार केला. नाशिक आयसीडीत स्टफिंगसाठी २४ तास सेवा सुरु केल्याबद्दल आभार व्यक्त केले. ही सुविधा कायमस्वरूपी करण्यात यावी, अशी मागणी सी. एस. सिंग यांनी केली.

याप्रसंगी मुख्य कस्टम आयुक्त के. सी. जॉनी, आयुक्त अविनाश थेटे, अतिरिक्त कस्टम आयुक्त अजित दान, उपायुक्त भारती पवार, महाराष्ट्र चेंबरचे मुंबई विभागाचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, विश्वस्त मंडळाचे चेअरमन आशिष पेडणेकर, कृषी व ग्रामविकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे, पोर्टस ॲण्ड लॉजिस्टिक डेव्हलपमेंट समितीचे चेअरमन सी. एस. सिंग उपस्थित होते.

याप्रसंगी द्राक्षे , फळफळावळ आणि भाजीपाला, कांदे व इतर कृषी उत्पादने मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रातून निर्यात केली जातात. ती निर्यात करताना काही विशेष संरक्षणात्मक कार्यवाही करावी लागते. द्राक्ष व भाजीपाल्यांच्या संदर्भामध्ये स्टफिंग अत्यावश्यक असते. त्याखेरीज त्याची खास परवानगीही मिळवणे आवश्यक असते. नाशिकसारख्या ठिकाणी अशा सर्व परवानग्या मिळत नाहीत. काही परवानग्यांसाठी नागपूर येथे अधिकार आहेत. तर काही परवानग्यासाठी पुणे, मुंबई अशा ठिकाणी जावे लागते. हा सर्व द्राविडी प्राणायमाचा विषय झाला आहे. यामुळे नाशवंत असणारी द्राक्षे, फळफळावळ आणि भाजीपाला, कांदे, गुलाबाची फुले अशा सर्व निर्यातदार शेतकऱ्यांपुढे, व्यापाऱ्यांपुढे विविध समस्या उभ्या ठाकतात. यादृष्टीने निर्यातीच्या क्षेत्रातील नाशिकचे स्थान लक्षात घेऊन सोयी व सुविधा आणि शासकीय, निमशासकीय आणि सर्व प्रकारच्या परवानग्या नाशिक येथेच मिळाव्यात म्हणून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँन्ड अग्रिकल्चर या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्य कस्टम आयुक्त के. सी. जॉनी यांची भेट घेतली.

महाराष्ट्र चेंबरचे कृषी व ग्रामविकास समितीचे चेअरमन राजाराम सांगळे यांनी लवकरच म्हणजे पुढील महिन्यापासून द्राक्ष निर्यातीचा हंगाम सुरु होत आहे. याकडे त्यांनी आयुक्तांचे लक्ष वेधले. नाशिक हे तर महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे द्राक्ष आगार असून जगभर ही द्राक्षे निर्यात होतात. देशामधून एकूण द्राक्ष निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा जवळपास ९३ टक्के इतका आहे. त्यात नाशिक येथून होणारी द्राक्ष निर्यात ही जवळपास ५० टक्के इतकी आहे. जानेवारी आणि फेब्रुवारी हे दोन महिने द्राक्ष निर्यातीसाठी महत्त्वाचे आणि धामधुमीचे असतात. महाराष्ट्रातून ही निर्यात प्रामुख्याने हॉलंड, इंग्लंड, रशिया, युनाइटेड अरब अमिरात अशा देशांना होते. गेल्या वर्षांमध्ये महाराष्ट्रातून निर्यात ३०६.३८ मिलियन डॉलर्स एवढी मोठी झाली आहे. हे लक्षात घेता नाशिकचे द्राक्ष निर्यातीमधील महत्त्वाचे स्थान सहज जाणवते, याची माहिती दिली. द्राक्ष, फळफळावळ अशा नाशवंत कृषी मालाची निर्यात अतिशय कमी वेळात आणि विशेष जलद गतीने करावी लागते. अन्यथा तो सर्व माल खराब होतो आणि त्यातून मोठे नुकसान सहन करावे लागते. स्टफिंगची परवानगी नागपूर येथून मिळत असल्याने येणाऱ्या समस्यांची माहिती त्यांनी दिली. जी गोष्ट नाशिकला सहजपणे करता येण्यासारखी आहे त्यासाठी थेट नागपूर गाठणे हा मोठा अडचणींचा, वेळखाऊ आणि खर्चाचा भाग आहे.

साहजिकच या निर्यातीसाठी लागणाऱ्या स्टफिंगसकटच्या सर्व सोयी व सुविधा नाशिकला असायला हव्यात. याकडेही शिष्टमंडळाने त्यांचे लक्ष वेधले. याप्रसंगी कार्यकारिणी सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, राजेंद्र कोठावदे, मनिष रावल, सहायक सचिव अविनाश पाठक उपस्थित होते.


**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई–निविदा सुचना

म.रा.वि.वि.कं.मर्या.कळवण विभागांतर्गत सन २०२४–२५ या आर्थिक वर्षासाठी वीज सुरक्षा साधनाची खरेदी करणेसाठी ई–निविदा क्रमांक टी–१४ अन्वये निविदा पात्र व नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ई–निविदा स्वरूपात डिजिटल सीलबंद व स्वाक्षरीकृत मागविण्यात येत आहे. साहित्याची यादी, निविदा शुल्क, ईएमडी इ.तपशील htttps://etender.mahadiscom.in/eatApp/ येथे उपलब्ध करण्यात आले आहे. सदर निविदा विक्रीसाठी दि. ०१.०२.२०२५ ते ०८.०२.२०२५ पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारीख ०८.०२.२०२५ आहे. निविदेच्या आवृत्तीत/शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या वेबसाईटवर प्रकाशित केला जाईल. संपर्क क्र. ७८७५७६६१४९.

पी.आर.ओ.क्र.–०५४/२०२५

कार्यकारी अभियंता,
सं. व सु. विभाग, कळवण.


# सरस्वती बँकेला न्यूबा पुरस्कार प्रदान




**सिद्ध पिंप्री (भ्रमर वार्ताहर) :–** ओझर येथील बळीराजासह चाकरमान्यांची प्रमुख अर्थवाहिनी असलेल्या सरस्वती सहकारी बँकेला नाशिक अर्बन बँक असोशिएशनचा तिसऱ्यांदा जिल्ह्याचा मानाचा न्युबा पुरस्कार मिळाला. सरस्वती बँकेस आजपर्यंत उत्कृष्ट आर्थिक कामगिरीबद्दल नऊ पुरस्कार मिळाले आहेत.

आर्थिक वर्ष २०२३–२०२४ मधील बँकेच्या ग्रामीण भागातील उत्कृष्ट कामगिरी व शिस्तबद्ध कार्यप्रणालीमुळे हा नाशिक अर्बन बँक असोसिएशन नाशिकतर्फे सव्वीस ते एकावन्न कोटी रुपयांपर्यंतच्या ग्रुपमधील ग्रामिण विभागातील प्रथम पारितोषिक देण्यात आले. सरस्वती बँक सव्वीस वर्षांपासून संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब बोरस्ते यांच्या शिस्तबध्द व अथक प्रयत्नांमुळे विपरित परिस्थितीतही नेत्रदिपक प्रगती करत आहे. संस्थेचे पाच हजार एकशे अठ्ठेचाळीस सभासद असून संस्थेची आजची आर्थिक परिस्थिती अशी, दोन कोटी अडुसष्ठ लाख १७ हजार भागभांडवल आहे. सुमारे पंचेचाळीस कोटी ९६ लाखांच्या ठेवी असून, ३० कोटी ९७ लाखांचे कर्जाचे वाटप केले आहे. २२ कोटी १५ लाखांची गुंतवणुक केलेली असून आर्थिक वर्षात ७४ लाख ९९ हजार रुपये नफा झालेला आहे. परिसरात सर्वात जास्त म्हणजे सभासदांना आठ टक्के लाभांश देणारी ही एकमेव बँक आहे.

उत्कृष्ट कामगिरीबद्दल नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनतर्फे लखनौ येथे न्यूबा अवॉर्ड २०२३–२४ सरस्वती सहकारी बँकेस बक्षीस न्युबाचे अध्यक्ष सुराणा, उपाध्यक्ष दुसाने, संचालक विश्वास ठाकूर, अजय ब्रम्हेचा, नानासाहेब सोनवणे, वसंत खैरनार व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब बोरस्ते, उपाध्यक्ष संजय निफाडे, मोहन पाटील, ॲड. शामराव पगार, निवृत्ती धनवटे यांनी स्विकारला. सर्वोत्कृष्ट बँक २००९ ते १० द्वितीय पुरस्कार रुपये ५० कोटींपर्यंत ठेवी असलेली बँक ओझर द महाराष्ट्र अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक फेडरेशन लिमिटेड, सर्वोत्कृष्ट बँक २०१०–११ तृतीय पुरस्कार रुपये ५० कोटींपर्यंत ठेवी असलेली बँक ओझर द महाराष्ट्र अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक फेडरेशन लिमिटेड. न्यूबा अॅवॉर्ड्स द नासिक जिल्हा नागरी नागरी सहकारी बँक असोसिएशनचा सन २०१४–१५ चा २५ कोटी रुपयांपर्यंत ठेवी असलेल्या बँकेच्या विभागीय गटामध्ये प्रथम पुरस्कार न्यूबा अवॉर्ड जैसलमेर २०१५ रुपये २५ कोटी, डिपॉझिटचा पुरस्कार न्यूबा अवॉर्ड द नासिक जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचा रुपये २५ कोटी पर्यंत ठेवी असलेल्या सन २०१५–१६ बँकांच्या विभागीय गटांमध्ये प्रथम पुरस्कार न्युबा अॅवॉर्ड सन २०१८ एक्सलंट वर्कींग फॉर ईयर सन २०१६ –१७ चा २५ ते ५० कोटींपर्यंत ठेवी प्रथम क्रमांक न्यूबा अॅवॉर्ड नासिक जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचा सन २०१७–१८ रुपये २५ ते ५० कोटींपर्यंत ठेवी असलेल्या बँकेच्या गटामध्ये तृतीय पुरस्कार. न्युबा अॅवॉर्ड २०२० एक्सलंट वर्कींग फॉर ईयर सन २०१८–१९ पन्नास कोटींपर्यंत ठेवी प्रथम क्रमांक असे ९ पुरस्कार मिळाले आहेत.

# डॉ. दौलतराव आहेर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वक्तृत्व स्पर्धा

**देवळा (भ्रमर वार्ताहर) :–** आपल्या मातीवर प्रेम करणारा डॉ. दौलतराव आहेर यांच्यासारखा विजिगिषू वृत्तीचा नेता पुन्हा होणे नाही, त्यांनी केलेल्या संस्कारांचा वारसा आज डॉ. राहुल आहेर पुढे चालवित आहेत, त्याच गोष्टींमुळे बाबा आज आपल्यात जिवंत आहेत, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते राहुल गिरी यांनी स्व. डॉ. दौलतराव आहेर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

माजी आरोग्यमंत्री स्व. डॉ. दौलतराव आहेर यांच्या नवव्या पुण्यस्मरणानिमित्त कसमादे परीसर विकास मंडळाच्या वतीने व्याख्यान, तसेच तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 'घे उंच भरारी' या विषयावर राहुल गिरी यांचे व्याख्यान संपन्न झाले. आयुष भामरे या विद्यार्थ्याने स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. देवळा येथील कर्मवीर रामरावजी आहेर महाविद्यालयाच्या प्रांगणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हितेंद्र आहेर होते. व्याख्याते राहुल गिरी, आमदार डॉ. राहुल आहेर, कसमादे परीसर विकास मंडळाचे सचिव कृष्णा बच्छाव, किशोर सूर्यवंशी पतसंस्थेचे संस्थापक प्रमोद पाटील, डॉ. वसंत आहेर, स्वप्निल ॲग्रोचे संचालक अरूण पवार, डॉ. रमणलाल सुराणा, पोपटराव पगार, प्रा. बी. के. रौंदळ आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

मी खालील सही करणार आज दि. १/२/२०२५ रोजी जाहीर करते, की माझे पती **जावेद अन्वर खान** यांचा मृत्यू दि. ४/९/२०२४ रोजी झाल्याने त्यांच्या नावावर असलेली अल्टो कार क्रमांक **MH 15 EP 6881** व मोटारसायकल क्रमांक **MH 15 CJ 4832** माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी मी **श्रीमती नाझनीन जावेद खान,** रा. रो.हाऊस नं. ५/६ तुळजाभवानी अपार्टमेंट,केरू पाटील नगर, जेलरोड, नाशिकरोड, नाशिक वारस हक्कदार (पत्नी) म्हणून मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे अर्ज करीत आहे. सदर अल्टो कार व मोटार सायकल या दोन्ही गाड्या माझ्या नावावर हस्तांतरित करणेकामी कोणाची हरकत असल्यास सात दिवसांच्या आत समक्ष भेटून कळवावे किंवा मे. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्याकडे लेखी संपर्क साधावा. सात दिवसांनंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. कळावे.

सही/–**श्रीमती नाझनीन जावेद खान**



**MAHATRANSCO** — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E-Tender Notice

Digitally signed online bids are invited through SRM E-tender process of MSETCL in two bid system from bidders who are registered Electrical Vendors/Contractors of MSETCL for following SRM E-tender;

| RFx No. | E-Tender No. | Particulars | Estimated Cost | EMD | Tender Fees |
|---|---|---|---|---|---|
| 7000034950 | T- 15/ 2024-25 (5th call) | Work of enhancement in transformation capacity of substation by providing additional 1X25MVA 132/33kV Transformer along with HV & LV bays at 132kV Nampur S/Stn under EHV O&M Division Nashik under MSKVY Phase - 2.0 (T/F will be provided by MSETCL) | Rs. 154.75 Lakh | Rs. 1,54,750.33 | Rs. 5900/- |

**Sale period:** 30.01.2025 to 09.02.2025, **Last Date of Submission:** 09.02.2025 up to 13:00 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 10.02.2025 at 11:00 Hrs(if possible). **Contact person**: Executive Engineer, EHV PC O&M Zone, Nashik. Phone No. 0253-2403010/02/07 Fax No. 0253-2403000, For further details please visit to https://srmetender.mahatransco.in

**Chief Engineer, EHV PC (O&M), Zone, MSETCL, Nashik.**



# कुंभमेळ्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी जलदगतीने उपाययोजना कराव्यात : डॉ.प्रवीण गेडाम

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :-** आगामी कुंभमेळा २०२७ च्या अनुषंगाने गर्दीचे नियोजन व सुरक्षिततेच्या दृष्टीने सी.सी.टीव्ही यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना जलदगतीने कराव्यात, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहात कुंभमेळा आढावा बैठकीत विभागीय आयुक्त डॉ. गेडाम बोलत होते. या बैठकीस जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, नाशिक महानगर विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माणिकराव गुरसळ, अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, जिल्हा नियोजन अधिकारी योगेंद्र चौधरी, त्र्यंबकेश्वर नगर परिषेच्या मुख्याधिकारी डॉ. श्रेया दवचक्के यांच्यासह संबंधित यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी नाशिक महानगरपालिका, स्मार्ट सिटी व त्र्यंबकेश्वर नगरपरिषद यांच्यातर्फे कुंभमेळ्याच्या दृष्टीने कार्यान्वित करण्यात येणाऱ्या सी. सी. टीव्ही यंत्रणेचा सादरीकरणाद्वारे आढावा घेतला. ते म्हणाले की, शहरात सद्य:स्थितीत १ हजार ३०० सी.सी.टीव्ही स्मार्ट सीटीच्या माध्यमातून बसविण्यात आलेले आहेत. यापेक्षा आवश्यकतेनुसार व निकड लक्षात घेवूनच शहरात व त्र्यंबकेश्वर येथे सी.सी.टीव्हींची संख्या वाढवून ३१ मार्चपर्यंत ते कार्यान्वित करावेत. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे साधुग्रामसाठी निश्चित जागा उपलब्ध करून तसा प्रस्ताव सादर करावा. आग प्रतिबंधासाठी पोलीस व महानगरपालिका व आग प्रतिबंधक यंत्रणा यांनी समन्वयाने धोकादायक स्थळे निश्चित करावीत,अशाही सूचना त्यांनी केल्या. कुंभमेळा यशस्वितेसाठी येणाऱ्या काळात प्रयागराज येथे आभ्यास दौरा आयोजित करण्यात येणार असल्याचे विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी यावेळी सांगितले.

# पळसेत कृषी शेतीशाळा वर्गात हरबरा पिकावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :-** महाराष्ट्र शासन कृषी विभाग राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान रब्बी हंगाम २०२४-२५ हरबरा पिकावर पळसे येथील जवळपास २५-३० शेतकऱ्यांची शेतीशाळा मार्गदर्शन शेतकरी संतोष गायधनी याच्या हरबऱ्याच्या शेतावर नाशिक कृषी विभागाने घेतली. यावेळी पिकासाठी घ्यावयाची काळजी आणि करावयाचे उपाय यावर मार्गदर्शन करण्यात आले.

हरभरा या पिकासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजने अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या हरभरा पीक प्रकल्पामधील शेतीशाळेचा वर्ग घेण्यात आला. यामध्ये हरभरा पिकाचे घाटेअळी किड नियंत्रण फेरोमन ट्रेप, नुकसान पातळी ओळखणे, तिचे नियंत्रण ठेवणे याबाबत कृषी पर्यवेक्षक संजय भांड, कृषि सहायक सविता आहिरे यांनी माहिती दिली. याचबरोबर रासायनिक फवारणी करताना घ्यावयाची काळजी, कमी विषारी औषधे कसे ओळखावे,काय करावे आणि काय करू नये याबाबत देखील सविस्तर माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.

या शेतीशाळा वर्गात कृषी पर्यवेक्षक संजय भांड, कृषी सहायक सविता आहिरे, कृषी मित्र संजय गायधनी, संदिप गायधनी,गणपत गायधनी, विष्णू गायधनी, साहेबराव गायधनी, रामकृष्ण गायखे, विलास ढेंरिगे, विलास गायधनी, कैलास गायधनी, दिलीप गायधनी,वसंत गायधनी,सागर गायधनी, कुणाल गायखे, धोंडीराम गायधनी,विष्णूपंत गायधनी, देविदास गायधनी, संतोष गायधनी, हिरामण गायधनी, बाळासाहेब ढेंरिगे,मधुकर पगार, दत्ता आगळे आदींसह शेतकरी उपस्थित होते.

# सहकारातून माणूस उभा रहातो म्हणून त्याला पर्याय नाही : अरुण गुजराथी



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** चोपडा बँकेला ८६ वर्षांची उज्वल परंपरा आहे. बँकिंगमध्ये ठेवीदारांप्रमाणे प्रामाणिक कर्जदार महत्वाचे असतात. पैसा योग्य प्रकारे फिरला तर रोजगार निर्माण होतात. संसार उभे रहातात. सहकार क्षेत्रात महाराष्ट्र अव्वल स्थानावर असून सहकारात मानवतावाद महत्वाचा आहे. कारण त्यातूनच माणूस उभा राहतो. सहकाराला पर्याय नाही, असे प्रतिपादन माजी विधानसभा अध्यक्ष अरुण गुजराथी यांनी केले. ते चोपडा बँकेच्या नाशिक शाखा उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

दि. चोपडा पीपल्स को - ऑप बँकेच्या नाशिक शाखेचा उद्घाटन सोहळा भोळे मंगल कार्यालयात नुकताच संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थानी माजी विधानसभा अध्यक्ष अरुण गुजराथी होते. प्रमुख पाहुणे व उद्घाटक माजी मंत्री आ. अनिल पाटील, आ. सीमा हिरे, माजी आ. नितीन भोसले, शैलेश कुटे, केशव पाटील, राज्य अर्बन बँक फेडरेशन अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, संचालक नानासाहेब सोनवणे, रत्नाकर कदम, जिल्हा बँक असोसिएशन अध्यक्ष हिरालाल सुराणा आदी उपस्थित होते.

बँकेचे अध्यक्ष चंद्रहास गुजराथी यांनी प्रास्ताविक केले. खान्देशातील बँक नाशिक महानगरीत दाखल झाली आहे. बँकेला चांगला प्रतिसाद मिळेल. चोपडा परिसरातील ५ लाख लोकांची वस्ती या सिडको भागात आहे. पहिल्याच दिवशी ५ कोटींच्या ठेवी मिळाल्या असून येत्या दोन वर्षात कोट्यवधींच्या ठेवी मिळतील. त्यामुळे बँक वृध्दींगत होईल हा विश्वास वाटतो, असे त्यांनी सांगितले. उपाध्यक्ष सुनीलकुमार जैन यांनी स्वागत केले.

अरुण गुजराथी म्हणाले, बँकिंग क्षेत्र अडचणीत असून ठेवी ठेवणारे भरपूर असतात. मात्र प्रामाणिकपणे कर्ज घेऊन ते फेडणारे खूप कमी आहेत. माणसाच्या आणि संस्थांच्याही जीवनात चारित्र्य व दायित्व महत्त्वाचे आहे. दानाचे मोल आहेच पण त्यापेक्षा रोजगार मिळवून देणे महत्त्वाचे असते. चोपडा बँकेने रोजगारनिर्मितीला चालना द्यावी, असा सल्ला त्यांनी दिला. आ. अनिल पाटील यांनी बँकेच्या विस्तारा इतकीच विश्वासार्हता जपली पाहिजे, याकडे लक्ष वेधले. चोपड्याशी आपले ऋणानुबंध असून ते या बँकेने मला वैयक्तिक दिलेल्या कर्जाने दृढ झाल्याचे नमूद केले.

संचालक मंडळ सदस्य अशोक अग्रवाल, डॉ. सुभाष देसाई, प्रा. डॉ. आशिष गुजराथी, सुनील गुजराथी, कैलास जैन, पवन गुजराथी, डॉ. नरेंद्र शिरसाट, डॉ. सुधाकर पाटील, राजश्री गुजराथी, वैशाली गुजराथी, ऋषी गुजराथी, मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश परांजपे, व्यवस्थापक किशोर गुजराथी तसेच सल्लागार मंडळ सदस्य शैलेश सुगंधी, प्रसाद आंबेकर, सतीश गुजर, नितीन चौधरी, राजेश कोठावदे, संतोष घिया, ज्ञानेश्वर पाटील, प्रविण जोशी आदी उपस्थित होते. त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. सायली आचार्य यांनी केले. नेमीचंद जैन यांनी आभार मानले. यावेळी मोठ्या संख्येने खान्देशातील नागरिक तसेच नाशिककर उपस्थित होते.

# मातोश्री पाटील विद्यालयाचे चित्रकला ग्रेड परीक्षेत यश

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** ज्ञान साधना शिक्षण प्रसारक संस्था संचलित महिरावणी येथील मातोश्री गिताबाई देवराम पाटील माध्यमिक विद्यालयाचा शासकीय चित्रकला ग्रेड एलिमेंटरी परीक्षेचा निकाल १०० टक्के आणि इंटरमिजिएटचा निकाल ९१.६७ टक्के लागला आहे. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाकडून सप्टेंबर-२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला ग्रेड परीक्षेचा निकाल नुकताच घोषित करण्यात आला असून या एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेत विद्यालयातील ९५ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते.

एलिमेंटरी परीक्षेत ५९ विद्यार्थी प्रविष्ट होत सर्व मुले उत्तीर्ण झाली असून त्यात श्रद्धा चोथे, ज्योती कापसे, कार्तिकी बागुल, शीतल कापसे, रिया पाटील, रितेश खांडबहाले तसेच इंटरमिजिएट परीक्षेत ३६ पैकी ३३ विद्यार्थी पास झाले असून त्यात भूमी साळवे, दिपाली दिवे, हर्षदा जगझाप, तनिष्का कापसे, धनश्री मते, काजल खांडबहाले, श्रावणी खांडबहाले, ज्ञानेश्वरी पगार, तुषार खेटरे, मोहन कापसे, तेजस दाते, शुभम पोटिंदे या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह सुयश मिळविले. यावेळी मुख्याध्यापक अशोक भदाणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

या यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे उपशिक्षक बाळासाहेब सोनवणे, अर्चना दीक्षित, योजना घरटे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष मुरलीधर पाटील व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक भदाणे, संजय पवार,समाधान शेवाळे,देवेंद्र देवरे, संजय गायकवाड, सुरेखा भामरे,अश्विन चौरे, दिपाली वाडीले, दिलीप खांडबहाले, विलास येवले आदींसह पालक वर्ग तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# रोटरी क्लब - लायन्स क्लबतर्फे आंतरशालेय विज्ञान प्रकल्प स्पर्धा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** रोटरी क्लब ऑफ नाशिकरोड आणि लायन्स क्लब ऑफ नाशिक कर्मवीर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी एका आंतरशालेय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व कलागुणांना वाव मिळावा, चांगले वैज्ञानिक तयार व्हावेत तसेच सर्वांगीण विकासाला चालना मिळावी या उद्देशाने आंतरशालेय विज्ञान प्रकल्प स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. उद्या (दि.२) माहेश्वरी भुवन, नाशिकरोड येथे सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत होणाऱ्या या उपक्रमात इयत्ता आठवी व नववीतील विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. रोटरी क्लब ऑफ नाशिकरोडचे अध्यक्ष ओ.पी. श्रीवास्तव आणि लायन्स क्लब ऑफ नाशिक कर्मवीरचे अध्यक्ष सुरेंद्र मिश्रा यांनी याबाबत माहिती दिली. प्रमुख पाहुणे म्हणून मेजर जनरल सायरस पिठावाला उपस्थित राहणार आहेत. ते विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधून प्रेरणा देतील. २० पेक्षा अधिक शाळांमधील विद्यार्थी सहभागी होतील. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना आकर्षक पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील, असे संयोजकांनी कळवले आहे.

# ग्रामीण साहित्य संमेलनाचे किरण भावसार यांच्या हस्ते उद्घाटन





**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** इगतपुरी तालुका साहित्य मंडळाच्या २५ व्या ग्रामीण संमेलनाचे उद्घाटन कवी किरण भावसार हे करणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक पुंजाजी मालुंजकर यांनी दिली.

किरण भावसार यांच्या 'मुळावरची माती सांभाळताना' या पहिल्याच काव्यसंग्रहाला यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा विशाखा काव्य पुरस्कार मिळाला आहे. त्यांचे स्वप्नवेड्या पंखासाठी, इरिंग मिरिंग, आपडी थापडी हे बाल काव्यसंग्रह, मित्राची गोष्ट ही किशोर कादंबरी, मी आपला उगीचच..! हा काव्यसंग्रह, गावकुसातील सोनं हा चरित्र ग्रंथ व घामाचे संदर्भ हा काव्यसंग्रह प्रकाशित आहे. हे पंचविसावे ग्रामीण साहित्य संमेलन १५ फेब्रुवारी रोजी वाडीवऱ्हे (ता. इगतपुरी) येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५.३० या वेळेत संपन्न होणार असून साहित्य रसिकांनी सहभागी होण्याचे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे. याप्रसंगी मंडळाचे उपाध्यक्ष ग्रंथमित्र बाळासाहेब फलटणे, दत्तात्रय झनकर, ॲड. ज्ञानेश्वर गुळवे, रवींद्र पाटील, ॲड. रतनकुमार ईचम, हिरामण शिंदे, सुदर्शन पाटील, बाणेश्वर पाटील, शरद मालुंजकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्री समर्थ बँकेस नरेंद्र पाटील यांची सदिच्छा भेट



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी श्री समर्थ सहकारी बँक लि. नाशिक यांच्या केंद्र कार्यालयात सदिच्छा भेट दिली.

या प्रसंगी त्यांनी मंडळाची सर्व माहिती बँकेला दिली. मंडळाद्वारे आर्थिक पाठबळ मिळाल्याने आतापर्यंत १ लाखापेक्षा अधिक मराठा समाजाच्या युवकांना आपला नवीन उद्योग उभा करण्यास मदत झाली आहे. बँकेने या योजने अंतर्गत दिलेल्या कर्जाच्या व्याजापोटी महामंडळ अधिकतम १२ % व्याज अनुदान देते. बँकेच्या कर्ज योजनेत याचा सहभाग करून घेऊन एक नवीन उमेद उद्योजक यांना द्यावी, ही सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.

या प्रसंगी श्री समर्थ सहकारी बँकेचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांनी सांगितले की, आम्ही आमच्या बँकेच्या कर्ज वाटपात या योजनेचा समावेश करून घेऊ व त्याचा लाभ हा आमच्या सर्व सभासद व इतर सर्व कर्जदारांना करून देऊ. जेणे करून नवीन उद्योजक निर्माण होण्यास बँकेचा सहभाग निश्चितच असेल.व्हा. चेअरमन राजेश गांगुर्डे यांनी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांचे बँकेच्या वतीने आभार मानून त्यांना ग्वाही दिली की, महामंडळाच्या योजनेचा आमची बँक फायदा घेऊन तरुण उद्योजकांना उभे करण्याचे काम करेल. कार्यक्रमात संचालक नरेंद्र कुलकर्णी, राधाकृष्ण नाईकवाडे, राजेंद्र खेडलेकर, पुष्कर पाराशरे, मंदार तगारे, मंदार ओलतीकर, योगिता खांडेकर, दीप्ती पंडित व महामंडळाचे योगेश शिंदे, सागर शेलार, पल्लवी मोरे, आशीष हिरे आणि बँकेचे सरव्यवस्थापक दीपक ठाकूर व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# जिल्हा परिषद अध्यक्ष चषक ४ व ५ फेब्रुवारी रोजी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** जिल्हा परिषद अध्यक्ष चषकाच्या सर्व तालुक्यांच्या गटस्तरीय फेरी संपन्न झाल्यानंतर आता जिल्हास्तरीय अध्यक्ष चषकाच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा दि. ४ व ५ फेब्रुवारी रोजी विभागीय क्रीडा संकुल येथे संपन्न होणार आहेत.

जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धा ही नाशिक जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली जाणारी स्पर्धा आहे. स्पर्धेचे आयोजन केंद्र स्तरावर आणि बीट स्तरावर आणि त्यानंतर तालुकास्तरावर केले जाते. मागील वर्षापासून जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धेत विद्यार्थ्यांमधील इंग्रजी भाषेबद्दल आवड निर्माण व्हावी व विद्यार्थ्यांच्या इंग्रजी शब्द संचय वाढावा यासाठी स्पेलिंग बी स्पर्धा घेण्यात येत आहे. यंदाच्या वर्षी विद्यार्थ्यांमधील गणितीय ज्ञान या हेतूने मॅथ्स बी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र स्तर बीट स्तर व त्यानंतर तालुका स्तरावर स्पेलिंग बी व मॅथ्स बी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून यातील प्रथम व द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर स्पर्धा होणार आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष चषकातील स्पर्धांचा उद्घाटन समारंभ हा दि. ४ रोजी विभागीय क्रीडा संकुल येथे शिक्षणमंत्री दादा भुसे, कृषि मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असून समारोप दि.५ रोजी होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. नितीन बच्छाव यांनी दिली.




# म्हसरूळला मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मेरी - म्हसरुळ परिसरातील सामाजिक कार्यकर्ते प्रवीण जाधव यांनी ग्रॅव्हिटी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या सहकार्याने नागरिकांच्या आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.

यावेळी प्रवीण जाधव म्हणाले की, नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्यांचे लवकरात लवकर निदान होणे, जेणेकरुन निदान झाल्यावर त्या समस्येवर उपचार करण्यासाठी रुग्णाला त्वरित आवश्यक ती पावले उचलता येणे शक्य होईल, या दृष्टीने आरोग्य तपासणी शिबिराचा उद्देश होता. या शिबिरात बदलत्या जीवनशैलीचा आरोग्यावर होणारा परिणाम आणि त्याबाबत घ्यावयाची काळजी या विषयावर प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. हिरालाल पवार, कॅन्सर तज्ज्ञ डॉ. श्रीकांत खरे, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. संजय जाधव, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. उदय साकुरीकर यांनी मार्गदर्शन केले. परिसरातील ५०० पेक्षा जास्त नागरिकांनी या शिबिरामध्ये सहभाग नोंदविला. शिबिरात ब्लड शुगर, ऑक्सिजन, रक्तदाब, डोळे तपासणी, जनरल चेकअप, अस्थिरोग संबंधी तपासणी, ईसीजी तसेच होमिओपॅथी तज्ज्ञ डॉक्टरांकडून शिबिरार्थींची तपासणी करण्यात आली. शिबिरात डॉ. दत्तात्रय मुळे, डॉ. अमोल खोलमकर, डॉ. हिमांशू कुलकर्णी, डॉ. योगेश जाधव, डॉ. रोहित कुलकर्णी, डॉ. मृणाल मुळे, डॉ. विनेश उगले यांनी मोफत सेवा दिली. तसेच एक्स रे, २ डी इको, अँजिओग्राफी आणि सोनोग्राफी या चाचण्या खास सवलतीच्या दरात तसेच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मोफत उपचार व शस्त्रक्रियेबाबत यावेळी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

# भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी डॉ. सागर भालेराव




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** भारतीय बालरोगतज्ज्ञांची संघटना गेल्या कित्येक वर्षांपासून कार्यरत आहे व बालरोगतज्ञांच्या न्यायय हक्कांसाठी, जनतेच्या मूलभूत प्रश्नांची जाणीव ठेवून सामाजिक कारणांसाठी तळागाळापर्यंत महत्वाच्या आजारांबद्दल जागरूकता निर्माण करत ही संघटना लढत असते व सामाजिक तथा काही एनजीओच्या मदतीने देखील यांचे कार्य सुरू असते, असे प्रतिपादन भारतीय बालरोगतज्ज्ञ परिषदेचे अध्यक्ष डॉ. वसंत खळतकर यांनी येथे केले. भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटनेची नुतन कार्यकारीणी जाहीर करण्यात आली. त्याप्रसंगी आयएमए सभाग्रहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या सोहळ्यात मावळते अध्यक्ष डॉ.सचिन चौधरी (अध्यक्ष), डॉ. सचिन पाटील (सचिव) २०२४ यांनी त्यांचा कार्यभार नूतन जिल्हाध्यक्ष डॉ. सागर भालेराव, नूतन सचिव डॉ. अतुल बोंडे यांच्याकडे सुपूर्द केला. नवीन कार्यकारिणीमध्ये डॉ. नीलिमा बदरखे (खजिनदार), डॉ. शीतल पगार (सहसचिव), डॉ. अविनाश गोरे (सहखजिनदार), डॉ. अरुण गचाले (नियोजित अध्यक्ष) यांनी २०२५ चा कार्यभार हाती घेऊन कार्यकारिणी बाल रोगतज्ज्ञांसाठी, सामाजिक कार्य तथा यामध्ये जास्तीत जास्त समन्वय साधण्यासाठी कार्यकारिणी प्रयत्नशील राहील, असे आश्वासन सर्वांनी दिले.

या सोहळ्यासाठी भारतीय बालरोगतज्ज्ञ परिषदेचे अध्यक्ष डॉ. वसंत खळतकर, सचिव डॉ. योगेश पारीख, नियोजित अध्यक्षा डॉ. नीलम मोहन, इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.संतोष कदम, महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष डॉ. संजय पाखमोडे, राज्यसचिव आणि भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटनेचे कार्यकारिणी सदस्य डॉ. अमोल पवार, राज्य खजिनदार डॉ.रवींद्र सोनवणे, नाशिक आयएमएचे नियोजित अध्यक्ष डॉ. निलेश निकम, ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. जे. एस. पटेल, डॉ. लढ्ढा, डॉ. चोपडा, डॉ. राजेंद्र कुलकर्णी, डॉ. संगीता लोढा आदी उपस्थित होते.




# बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी):-** येथील बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी संविधान व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख अतिथी म्हणून तुषार पगारे यांच्यासह संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नितीन डांगळे, मुख्याध्यापक योगीता थोरात मंचावर उपस्थित होते. अशोक जगताप, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष सोनाली मोरे, शालेय समिती अध्यक्ष राजाभाऊ सोनवणे, उपाध्यक्ष राजेश जाधव, कल्पना जगताप, अनिल मोरे, अरुण भदरगे, रेखा भदरगे, मीना गांगुर्डे, मनीषा पवार, माधुरी अहिरे, सुनीता पवार, जयश्री गांगुर्डे, सुषमा उबाळे, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध घोषणा देऊन स्फूर्तिदायक वातारण तयार केले. दीप्ती सोनवणे, मयुरी ढोके, शिल्पा अहिरे, विजय शिरसाठ, मिलिंद शिरसाठ, अमृता थोरात, निशा सरोदे, दीक्षा पगारे, साजिया पठाण, कल्याणी कटारे, प्रतीक्षा साळवे, विद्या गवारे यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**जाहीर आवाहन**
**गुइलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस)**

➢ **आजाराची सर्वसाधारण लक्षणे:-**
- अचानक पायातील किंवा हातात येणारी कमजोरी/लकवा.
- अचानकपणे उद्भवलेला चालण्यातील त्रास किंवा कमजोरी.
- डायरिया (जास्त दिवसांचा)

➢ **नागरिकांनी घ्यावयाची काळजी:-**
- पिण्याचे पाणी दुषित राहणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. उदा. पाणी उकळून घेणे.
- अन्न स्वच्छ आणि ताजे असावे.
- वैयक्तिक स्वच्छतेवर भर देण्यात यावा.
- शिजलेले अन्न आणि न शिजलेले अन्न एकत्रित न ठेवल्यासही संसर्ग टाळता येईल.
- खासगी वैद्यकीय व्यावसायिकांनी जीबीएस रुग्ण आढळून आल्यास त्वरित सार्वजनिक आरोग्य विभाग नाशिक महानगरपालिका नाशिक येथे त्वरित संपर्क साधावा.

गुइलेन बरे सिंड्रोम (जीबीएस) रोगाचे लक्षणे आढळताच शासकीय/ मनपा/ खाजगी वैदयकीय अधिकारी, यांच्याशी संपर्क साधुन तात्काळ उपचार सुरु करावा.

**घाबरू नका पण दक्षता घ्या .**
**सार्वजनिक आरोग्य विभाग मनपा नाशिक व्दारे जनहितार्थ प्रकाशित**

सही/-
मनिषा खत्री, (भा.प्र.से)
आयुक्त तथा, प्रशासक
नाशिक महानगरपालिका, नाशिक

सही/-
स्मिता झगडे,
अतिरिक्त आयुक्त(सेवा)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

सही/-
डॉ. तानाजी चव्हाण,
वैद्यकीय आरोग्य अधिकारी,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

जनसंपर्क/जा.क्र/३५१/२०२५
दि.३१/०१/२०२५.

झाडे लावा, झाडे जगवा

## आजचे वाढदिवस


केशवराव पाटील
अध्यक्ष, कालिका मंदिर


विजय ढमाळ
वरिष्ठ पोलीस निरीक्षक


शेखरभाई शाह
सामाजिक कार्यकर्ते



श्याम पवार
संचालक, श्रेया व्हेंचर्स


राज सोनी
त्र्यंबकेश्वर


विजयकुमार अहिरे
सामाजिक कार्यकर्ते

## उद्याचे वाढदिवस


फारुक पठाण
पत्रकार


जयदीप वैशंपायन
वकील


वाळू नवले
उपाध्यक्ष, नाशिक जिल्हा तालीम संघ


सौ. शुभदा बोरा
सामाजिक कार्यकर्त्या

### सोयाबीन खरेदीला मुदतवाढ

मुंबई : हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी सहा फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या मुदतवाढीचा फायदा मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांना होणार आहे. सोयाबीन खरेदीची पहिली मुदत १२ जानेवारीपर्यंत होती. ती आता वाढविण्यात आली.

# त्रिमूर्ती चौकात अतिक्रमण विभागाची कारवाई

## पोलीस बंदोबस्तात दुकानांबाहेरील ओटे जेसीबीने काढले

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):–** सिडकोतील अतिशय वर्दळीचे ठिकाण असलेल्या दत्त मंदिरपासून ते त्रिमूर्ती चौकासह दिव्या अ‍ॅड लॅब दरम्यान गेल्या काही महिन्यांपासून दुतर्फा पथविक्रेत्यांनी तसेच दुकानांसमोर बेकायदेशीर ओटे तसेच शेड बांधून अतिक्रमण केल्याने या ठिकाणी खरेदीसाठी येणारे नागरिक थेट रस्त्यात वाहने पार्किंग करतात. यामुळे नियमित वाहतुकीची कोंडी होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसून येते.



याबाबत स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी आंदोलने करून निवेदने देऊनही अतिक्रमणाचा प्रश्न मार्गी लागत नसल्याने अखेर काल अतिक्रमण विभागाने या ठिकाणी धडक कारवाई करून दुकानाबाहेरील अन्य साहित्य तसेच जेसीबीच्या सहाय्याने ओटे हटविले आहे. या कारवाईत सिडको, सातपूर, पंचवटी नाशिकरोड यांसह पाचही विभागांचे कर्मचारी सहभागी झाले.

या परिसरात तब्बल दहा ते वीस फूट रस्त्याच्या आतमध्ये अतिक्रमण असल्याने या ठिकाणी नियमित वाहतूक कोंडी होऊन लांबच लांब रांगा लागत होत्या. अनेकदा नागरिकांनी वाढत्या अतिक्रमणाबाबत आंदोलनेही केली. मात्र महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून या ठिकाणी कोणतीही कारवाई केली जात नव्हती. अखेर काल संयुक्त कारवाई करून अतिक्रमण विभागाने त्रिमूर्ती चौक ते दत्त मंदिर परिसरातील अनधिकृत ओटे तसेच फेब्रिकेशनचे शेड जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त केले.

या कारवाईत पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तसेच अतिक्रमण विभागाच्या पाचही विभागांतील ५० ते ६० कर्मचारी सहभागी झाले होते. गेल्या दोन दिवसांपूर्वीच मनपाच्या अतिक्रमण हटाव पथकाने त्रिमूर्ती चौकातील अतिक्रमण हटवले होते . त्यानंतर पुन्हा दोन दिवसांनी त्रिमूर्ती चौकात अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आल्याने अतिक्रमण धारकांचे धाबे दणाणले आहे. एकीकडे अतिक्रमण हटाव मोहीम सुरु असताना दुसरीकडे काही अतिक्रमण धारकांनी स्वयंस्फूर्तीने आपापले अतिक्रमण काढून घेतल्याचे दिसून आले.

# राहुड घाटात स्कूल बस व कारचा अपघात; एकाचा मृत्यू, तीन जण गंभीर जखमी



**चांदवड,(वार्ताहर):–** मुंबई–आग्रा महामार्गावरील राहुड घाटात जिओ पेट्रोल पंपासमोर स्कूल बसला कारने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात कारमधील तीन जण गंभीर जखमी, तर एकाचा मृत्यू झाला. सुदैवाने बसमधील विद्यार्थी बचावले आणि मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, चांदवड येथील राहुड घाटात जिओ पेट्रोल पंपासमोर स्कूल बस (क्र. एम.एच. १५ अे.के. १६७९) ही बस मुलांना घेण्यासाठी रस्त्याच्या कडेला आधीच उभी होती. त्यावेळी पाठीमागून सुसाट येणारी स्वीप्ट कार (क्र. जी. जे.१५ सी.जे. ७३०३) या कारवरील वाहन चालकाचा कारवरील ताबा सुटल्याने कारने बसला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, कारचा अर्धा भाग बसच्या मागील टायरपर्यंत दाबला गेला. त्यात कारचा चक्काचुर झाला. यावेळी बसमधील विद्यार्थी थोडक्यात बचावले असून सुदैवाने पुढील मोठा अनर्थ टळला आहे.

अपघात झाल्याची माहिती मिळताच राहुड घाट अपघातस्थळी जवळच उभी असलेली जगद्गुरु नरेंद्रचार्य महाराज संस्थान नाणिजधाम रत्नागिरी यांची विनामूल्य सेवा देणारी रुग्णवाहिका ताबडतोब घटनास्थळी पोहोचली. अपघातग्रस्तांना चांदवड उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तसेच सोमा टोल कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी क्रेनच्या मदतीने चार चाकी वाहनाला बाहेर काढले. वाहन चालक अती वेगाने वाहन चालवितात व परिणामी वाहनावरील नियंत्रण सुटते. यातून असे अपघात होतात. या अपघातात मनोज शिवाजी गटरे (वय ४०, रा. बोरकुल), स्वप्नील दादाजी बच्छाव ( वय ३५) हे दोघे गंभीर जखमी झाले. या दोघांना चांदवड उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

मालेगाव येथे उपचारासाठी पाठविण्यात आलेल्या एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. मयत व्यक्ती बोरकुंड धुळे येथील असल्याचे समजते. तर एकाची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले असून दोघांची नावे समजू शकली नाही. सोमा कंपनी, जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या मोफत रुग्णवाहिकेने व स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने मदत करून तातडीने जखमींना रुग्णालयात दाखल केले.

# जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी अपार आयडीचे आतापर्यंत ८४.०९ टक्के काम पूर्ण

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी केली जावी, या उद्देशाने केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या माध्यमातून वन नेशन, वन स्टुडंट आयडी तयार केले जाणार आहे. या धर्तीवर शालेय विद्यार्थ्यांसाठी अपार (ऑटोमेटेड परमनंट अकॅडमिक रजिस्ट्री) आयडी काढण्याचा निर्णय केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून घेण्यात आला आहे. या अपार अयडीचे काम नाशिक जिल्ह्यात अंतिम टप्प्यात आले असून ८४. ०९ टक्के काम पूर्ण झाले आहे.

नाशिक जिल्ह्यात ५ हजार ५८६ शाळांमधील १२ लाख ८८ हजार ३४० विद्यार्थ्यांपैकी १० लाख ८३ हजार ३७० विद्यार्थ्यांचे अपार आयडी तयार करण्याचे काम पूर्ण झाले आहे. तर उर्वरित अपार आयडी नोंदविण्याचे काम जलद गतीने करण्याचे काम सुरू आहे. एकदा हा आयडी निर्माण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विशेष क्रमांक मिळणार आहे. या क्रमांकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध होणार आहे. त्यामुळे कोणत्याही वेळी ही माहिती ऑनलाइन पाहता येणार आहे. दरम्यान, एक महिन्याच्या कालावधीमध्ये बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना अपार आयडी उपलब्ध करुन देण्याच्या सूचना राज्य प्रकल्प संचालकांकडून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार युद्ध पातळीवर कार्य सुरु असून लवकरच ते पुर्ण करण्यात येणार आहे.

अपार आयडी तयार करण्यात चांदवड तालुका प्रथम क्रमांकावर आहे. या तालुक्यामध्ये ९३.७९ टक्के काम पुर्ण झाले आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर नाशिक महापालिका क्षेत्र भाग–१ असून ८९.८७ टक्के कामकाज झाले आहे. तिसऱ्या स्थानी निफाड ८८.५७, चौथ्या स्थानी त्र्यंबकेश्वर तालूका असून ८६.५९, पाचवा क्रमांकावर बागलाण ८५.९२ टक्के, सहाव्या क्रमांकावर नाशिक ग्रामीण ८५.६४ टक्के, सातव्या क्रमांकावर कळवण ८५.२० टक्के, आठव्या क्रमांकावर मालेगाव महापालिका क्षेत्र ८४. ९५ टक्के, नवव्या क्रमांकावर सुरगाणा ८४.९० टक्के, दहाव्या क्रमांकावर सिन्नर ८४.६६ टक्के ,अकराव्या क्रमांकावर नांदगाव ८१.७८ टक्के, बाराव्या क्रमांकावर पेठ ८१.५० टक्के,तेराव्या क्रमांकावर इगतपुरी ८०.८८ टक्के,चौदाव्या क्रमांकावर नाशिक ८०.६६ टक्के, पंधराव्या क्रमांकावर दिंडोरी ७९.७७ टक्के, सोळाव्या क्रमांकावर देवळा ७७.२५, सतराव्या क्रमांकावर मालेगाव ७५.४४ टक्के, तर सर्वात कमी अठराव्या क्रमांकावर येवला तालुका ७२.९१ टक्के नोंदणीचे काम २९ जानेवारीपर्यंत पूर्ण झाले आहे.

### तळेगाव दाभाडे येथे तरुणाचा खून

**पिंपरी (भ्रमर वृत्तसेवा):–** किरकोळ वादातून एका तरुणाचा धारदार शस्त्राने वार करून खून केल्याची घटना तळेगाव दाभाडे येथील सरस्वती विद्यालयासमोर शुक्रवारी दुपारी घडली. आर्यन शंकर बेडेकर (वय १९, रा. सिद्धार्थनगर, तळेगाव स्टेशन) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, आर्यन याच्यावर ओळखीच्या चार जणांनी हल्ला केला. आर्यन आणि संशयित यांच्यामध्ये किरकोळ वाद झाला होता. त्याचा राग मनात धरून संशयितांनी आर्यनवर कोयता व धारदार शस्त्राने वार केले.

# माघी गणेश जयंतीनिमित्त शहरात विविध कार्यक्रम

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** आज माघी गणेश जयंती असल्यामुळे नाशिक शहर परिसरातील गणेश मंदिरांबरोबरच अन्य मंदिरात देखील मोठ्या प्रमाणावर विविध धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



श्री माघी गणेश जयंती निमित्ताने नाशिक शहर परिसरातील पेठेतील खांदवे गणपती, नाव दरवाजा येथील प्राचीन शिंगणे गणपती, आसराची वेस येथील मोदकेश्वर, मेनरोडचा गणपती, कारंजा येथील चांदीचा गणपती, अशोकस्तंभावरील ढोल्या गणपती, भद्रकाली येथील साक्षी गणेश, अब्दुल हमीद चौकातील उपाध्ये गणपती, सराफ बाजारातील पगडीचा गणेश, दुर्गा मंगल कार्यालया जवळील इच्छामणी गणपती, गंगापूर रोडवरील श्री नवशा गणपती मंदिरासह सातपूर, नाशिकरोड, इंदिरानगर, देवळाली गाव, सिडको, पंचवटी जुन्या नव्या गणेश मंदिरांबरोबरच काही घरातही आज माघी गणेश जन्मोत्सवानिमित्त सकाळपासूनच धार्मिक सोहळ्याला प्रारंभ झाला आहे.

दोन–तीन दिवसांपूर्वी या सर्व यांची स्वच्छता करून रंगरंगोटी बरोबरच विद्युत रोषणाई व फुलांनी मंदिराचा परिसर सजवण्यात आला असून या ठिकाणी गणेश स्तोत्र, गणपती अथर्वशीर्ष, पुण्याह वाचन, महापूजा, महाअभिषेक आदी धार्मिक कार्यक्रमांबरोबरच महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले असून भाविकांनी गणेश जन्मोत्सव कार्यक्रम अधिकाधिक आनंदात व उत्साहात साजरा करण्यात येत असल्याचे सर्वत्र दिसत आहे

# एसएमबीटीचे मेंदू व मनकेविकार तज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी यांनी पार पाडली यशस्वी शस्त्रक्रिया

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** दुःख अडवायला उंबऱ्यासारखा, मित्र वणव्यामध्ये गारव्या सारखा. कवी अनंत राऊत यांनी लिहिलेली ही कविता मित्रांच्या नात्याची, त्यांच्याप्रती असलेल्या अनोख्या प्रेमाची आणि अतूट विश्वासाची नेहमीच साक्ष देत असते. अशीच घटना नाशकात घडली आणि चाळीस वर्षापूर्वीचे वर्गमित्र असलेल्या दोघा मित्रांनी तिसऱ्या मित्राच्या मेंदूवर क्लिष्ट शस्त्रक्रिया केली. या अनोख्या घटनेची नाशकात चर्चा असून डॉक्टरांच्या अनोख्या यारी–दोस्तीचे सध्या कौतुक केले जात आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, एसएमबीटी हॉस्पिटलचे मेंदू व मणकेविकार तज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी, भूलतज्ज्ञ डॉ. पंकज गुप्ता व जिल्हा वैद्यकीय अधिकारी असलेले डॉ. योगेश (नाव बदललेले) हे वर्गमित्र आहेत. डॉ. योगेश यांना गेल्या काही दिवसांपासून डोकेदुखी, तोल जाणे असा त्रास होत होता. त्यांनी जवळच्या एका डॉक्टरांना दाखवले व येथील डॉक्टरांनी त्यांना मेंदूचा एमआरआय करण्यास सांगितले. दरम्यान, मेंदूत गाठ असल्याचे या तपासणीमध्ये निष्पन्न झाल्यानंतर डॉ. योगेश यांनी मुंबई आणि पुण्यातील काही मेंदू आणि मणकेविकार तज्ज्ञांचा सल्ला घेतला. येथील सर्वच डॉक्टरांनी त्यांना ऑपरेशन करावे लागेल याबाबत सांगितले.

डॉ. योगेश हे एसएमबीटी हॉस्पिटल येथे मेंदू व मणकेविकार तज्ञ म्हणून कार्यरत असलेले त्यांचे वर्गमित्र डॉ. हितेंद्र गडकरी यांच्याकडे आले. त्यांनी घडलेला सर्व घटनाक्रम सांगितला. त्यानंतर डॉ. गडकरी यांनी त्यांच्या सर्व तपासण्या करण्यास सांगितल्या. यामध्ये ही गाठ काही प्रमाणात वाढल्याचे निदर्शनास आले. त्यांना ॲकोस्टिक न्युरोमाची गाठ असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे लवकरात लवकर ही गाठ काढून टाकण्याचा सल्ला त्यांनी डॉ. योगेश यांना दिला. कुठल्याही शस्त्रक्रियेसाठी भूलतज्ज्ञाची भूमिका महत्त्वाची असते तर ही भूमिका कोण पार पाडणार? असा प्रश्न उपस्थित असताना डॉ. गडकरी यांच्या मदतीला नाशिकचे प्रख्यात भूलतज्ज्ञ व भारतीय भूलतज्ज्ञ असोसिएशनचे डॉ. पंकज गुप्ता धावून आले. योगायोग असा की. डॉ गुप्ता हेदेखील डॉ. गडकरी आणि डॉ. योगेश यांचे वर्गमित्र असल्याने यारी–दोस्तीच्या या अनोख्या प्रसंगाची सुरुवात झाली. दोघा मित्रांसमोर आता तिसऱ्या डॉक्टर मित्रावर शस्त्रक्रिया करणे मोठे आव्हान होते. प्रत्येक व्यक्तीला जीवनात अनेक प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागते. अशा वेळी मित्राचे महत्त्व वाढते. असे मित्र नेहमीच तुम्हाला धीर देतात आणि कठीण परिस्थितीतही तुमची साथ सोडत नाहीत. मित्रांनी निर्णय घेतला की, डॉ.



योगेश यांच्यावर नाशकात शस्त्रक्रिया करून त्यांना लवकर यातून बाहेर काढू. शस्त्रक्रिया अतिशय क्लिष्ट होती पण मैत्रीची पकड मजबूत होती. सकाळी ९ वाजता सुरु झालेली शस्त्रक्रिया दुपारी तीन वाजेपर्यंत चालली. शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याचे डॉ. गडकरी आणि डॉ गुप्ता यांनी बाहेर येऊन नातेवाईकांना सांगितले. डॉ. योगेश यांना शुद्धीवर येण्यासाठी आणखी काही वेळ द्यावा लागणार असल्याने सर्वजण ते शुद्धीवर येईपर्यंत तिथेच थांबून होते. अखेर डॉ. योगेश शुद्धीवर आले आणि मैत्रीचा आनंदोत्सव या तिघांसह उपस्थित सर्वांनीच साजरा केला. या घटनेची माहिती सर्वदूर पोहोचताच अनेकांनी या अतूट मैत्रीचे कौतुक केले. गेल्या काही दिवसांपासून नाशकात या अनोख्या घटनेची चर्चा होताना दिसते आहे. मेंदू आणि मणकेविकारावर उपचार महागडे आहेत, परंतु एसएमबीटी हॉस्पिटल अशी एक जागा आहे, जिथे बहुतांश उपचार शासकीय योजनेअंतर्गत मोफत होतात तर योजनेत न बसणारे उपचार अतिशय माफक दरात होतात. गेल्या ३० पेक्षा अधिक वर्षांपासून मेंदू आणि मणकेविकार उपचार मी करत आहे. दर महिन्यात माझ्या हातून ३०–४० मेंदू व मणकेविकार शस्त्रक्रिया होतात. आज एका मित्रावर यशस्वी उपचार केल्याने या सेवेचे सार्थक झाल्याचा आनंद आहे, असे मेंदू आणि मणकेविकार तज्ज्ञ डॉ. हितेंद्र गडकरी म्हणाले.

**अशी झाली शस्त्रक्रिया–** लहान मेंदूला चिकटलेली चार बाय तीन सेमीची मोठी गाठ होती. मेंदूतील महत्वाच्या नसांना चिकटलेल्या या गाठीला सोडवून क्युसा या अत्याधुनिक मशीनद्वारे संपूर्णपणे काढण्यास यश आले. या शस्त्रक्रियेनंतर रुग्णाला व्हेंटीलेटरवर ठेवण्याची गरज पडली नाही. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये ब्रेन व स्पाईन एन्डोस्कोपिक सर्जरीच्या माध्यमातून सर्वसामान्य रुग्णांना मोफत उपचारांचा लाभ होणार असल्याचे डॉ. गडकरी म्हणाले.

# नर्मदा परिक्रमेतून हजारो वर्षांपूर्वीची संस्कृती जतन करण्याचा प्रयत्न

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नर्मदा–परिक्रमा हा भारतीय संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे. परंतु याबाबतीत वस्तुनिष्ठ माहिती सहज उपलब्ध नसल्यामुळे परिक्रमेच्या खडतरपणाचाच विनाकारण बाऊ केला जातो. परिक्रमेचे मर्म आणि माहात्म्य ज्याच्याकडे म्हणावे तितके लक्ष न दिल्यामुळे नर्मदा–परिक्रमेसाठी निघावे, अशी इच्छा मनात बाळगणारे लोक द्विधा मनस्थितीत सापडतात.परंतु आता नर्मदा परिक्रमा यात्रा सहज शक्य असल्याचे यात्रेत सहभागी यात्रेकरूनी सांगितले. नाशिक शहर परिसरातील लाखलगाव येथील सुमारे १५० ग्रामस्थांनी नर्मदा परिक्रमासाठी नाशिकच्या चौधरी



यात्रा कंपनी प्रा.लि. कंपनीकडून ओंकारेश्वर, प्रकाशा, कटपोर, भरूच, अंकलेश्वर, शुक्लतीर्थ, नारेश्वर, गरूडेश्वर, महेश्वर, उज्जैन, बेढाघाट, नेमावर, अमरकंटक, महाराजपूर, होशंगाबाद, ओंकारेश्वर अशी १३ दिवसीय सहलीचा शुभारंभ चौधरी यात्रा कंपनीचे संचालक सत्यनारायण चौधरी, रामगोपाल चौधरी, रमेश चौधरी, माजी पंचायत समिती सभापती निवृत्ती काडेकर, सरपंच गणपत कानडे, सोसायटी चेअरमन किसन कांडेकर, सुरेश कांडेकर, मंदाकिनी कांडेकर, हिला कांडेकर, संचालक जगन्नाथ कटाळे तसेच टूर मॅनेजर भाऊसाहेब कांडेकर, पांडुरंग गांगुर्डे, विकी भामरे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. यावेळी पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. याविषयी अधिक माहिती देताना चौधरी म्हणाले की, भारतीय संस्कृतीमध्ये नद्यांना लोकमाता अर्थात देवता मानतात. नद्यांच्या दैवी प्रभावाची कल्पना–जाणीव आपल्या पूर्वसुरीना असल्यामुळे नद्यांबद्दल पूज्यभावना कृतज्ञता आणि आदर व्यक्त करण्याची पुरातन परंपरा इथल्या भूमित चालत आलेली आहे. नर्मद्रा परिक्रमेला महत्त्व प्राप्त झाले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# महाटेक २०२५ औद्योगिक प्रदर्शनाला ६ फेब्रुवारीपासून सुरुवात

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** महाटेक २०२५ औद्योगिक प्रदर्शनाला शुक्रवार (दि. ६) पासून सुरुवात होणार असून नाशिकच्या उद्योगांचा सहभाग राहणार आहे. दि. ६ ते ९ फेब्रुवारी दरम्यान नवीन कृषी महाविद्यालय पटांगण, सिंचननगर, शिवाजीनगर, पुणे येथे सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे.

महाटेकचे हे २२ वे वर्ष असून या प्रदर्शनात भारतातून ४०० पेक्षा जास्त उद्योजक सहभागी होणार असून जवळपास २५,००० हून अधिक ग्राहक भेट देणार आहेत. याविषयी अधिक माहिती देताना मराठे इन्फोटेक प्रा. लि. चे संचालक सुमुख मराठे म्हणाले, की, उत्पादन क्षेत्राला योग्य व्यासपीठ देऊन त्यांच्या वाढीला चालना देणे हे महाटेकचे ध्येय आहे. अनेक मोठ्या औद्योगिक उद्योजकांनी त्यांच्या उत्पादन आणि खरेदीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी महाटेक २०२५ ला भेट देणे अपेक्षित आहे. या प्रदर्शनात सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य असून, ऑनलाईन नोंदणी सेवा उपलब्ध आहे. महाटेक २०२५ च्या भव्य औद्योगिक प्रदर्शनाचे उद्घाटन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत आणि मॅनेजिंग डायरेक्टर ऑफ कैझेंन इन्स्टिट्यूट विनोद ग्रोवर यांच्या हस्ते होणार आहे. महाटेकच्या या चार दिवसीय औद्योगिक प्रदर्शनामध्ये अत्याधुनिक उत्पादने, यंत्रे व उपकरणे विपणनासाठी आणि विक्रीसाठी ठेवण्यात येणार आहेत. हे प्रदर्शन मशीन टूल्स, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स, इन्स्ट्रुमेंटेशनव ऑटोमेशन इक्विपमेंट्स, फार्मा आणि सपोर्टिंग इंडस्ट्रीज मधील कॉर्पोरेट्स, लघु व मध्यम उद्योगांसाठी उपलब्ध आहे. याविषयी अधिक माहिती देताना मराठे इन्फोटेक प्रा. लि.च्या संचालिका गौरी मराठे म्हणाल्या, आम्ही महाटेक मधील प्रदर्शकांसाठीच व्हेंडर डेव्हलपमेंट मीट आयोजित करणार आहोत.

## साधूग्रामच्या अतिरिक्त जागेसाठी मेरीची

(पान १ वरून) सुचना अधिकार्यांना दिल्या. मनपाच्या आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री यांनी रामकालपतबाबत माहिती सादर करताना केंद्र शासनाने १०० कोटींचा निधी वर्ग केला आहे. मात्र महापालिकेने तयार केलेले आराखड्यामध्ये १४६ कोटींचा खर्च अपेक्षित आहे त्यासाठी ४६ कोटींची तरतूद राज्य शासनाकडून करण्याची विनंती पालक सचिवांकडे त्यांनी केली. याबाबत पालक सचिव एकनाथ डवले यांनी नोंद करून घेत असल्याचे सांगितले. शहरातील रामसेतू पुलासह गोदावरीवरील ७ पुलांपैकी ५ पूल नव्याने बांधण्याची गरज आहे. त्यासाठी १५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेता काही पूल हे एकमार्गी असून ते दुहेरी करण्याची गरज असल्याचेही मनपा आयुक्त खात्री यांनी नमूद केले.

## मनपा आयुक्त खत्री यांनी केली...

(पान १ वरून)सोईसुविधा या ठिकाणी निर्माण केल्या जात आहे.

प्रकल्पस्थळी पाहणी केल्यानंतर आयुक्त खत्री यांनी विविध सूचना देत कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या पाहणी दौऱ्यात शहर अभियंता संजय अग्रवाल, अधीक्षक अभियंता अविनाश धनाईत, कार्यकारी अभियंता संदेश शिंदे, अनिल गायकवाड, उपअभियंता नितीन राजपूत, नितीन धामणे, वसंत ढुमसे, प्रशांत बोरसे, किरण बोडके यासंह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## विजयकुमार थोरात यांचे जहांगीर कलादालनात चित्रप्रदर्शन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नाशिकचे हौशी चित्रकार विजयकुमार थोरात यांचे मुंबईतील जहांगीर कलादालनात चित्रप्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. दि. ३ ते ९ दरम्यान होणाऱ्या 'कला साधना ' या चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन कलासमीक्षक प्रा. डॉ. गजानन शेपाळ यांच्या हस्ते होणार आहे. वायूदलात सेवा बजावलेल्या विजयकुमार थोरात यांनी आपला चित्रकलेचा छंद सातत्याने साधना करून जोपासला.



जहांगीर कलादालनात आपल्या चित्रांचे प्रदर्शन व्हावे हे त्यांचे स्वप्न प्रत्यक्षात येत आहे. विविध विषयांवरील व वेगवेगळ्या रंगमाध्यमातील सुमारे ५० चित्रे प्रदर्शित करण्यात येतील. उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून नाशिकचे ज्येष्ठ चित्रकार प्रा. मुरलीधर रोकडे, प्रा. बाळ नगरकर, प्रा.दीपक वर्मा, प्रा. योगेश जोशी उपस्थित राहणार आहेत. या प्रदर्शनात वास्तववादी पध्दतीची चित्रे कलारसिकांना सकाळी ११ ते संध्याकाळी ७ या वेळेत विनामूल्य बघता येतील.

# राष्ट्रवादीकडून महानगरपालिकेसमोर घरपट्टी,पाणीपट्टीची होळी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** शहरातील काही भागांप्रमाणेच पंचवटी परिसरात गेल्या काही दिवसांपासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून अनेक भागातील रस्त्यांची चाळण झालेली असल्याने घरपट्टी व पाणीपट्टीची आकारणी करण्यात येऊ नये, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पार्टी ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. सुरेश आव्हाड यांनी केली. यावेळी राजीव गांधी भवन प्रवेशद्वारावर घरपट्टी, पाणीपट्टीची होळी करुन निषेध नोंदवून आयुक्त मनीषा खत्री यांना निवेदन दिले.

विद्या नगर, समर्थ नगर, वडजैमाता नगर, महादेव बाग, मनपा कॉलनी, तांबे मळा, मातोश्री नगर, शांती नगर, ओमनगर, भगवानबाबा नगर, महालक्ष्मी नगर, रामकृष्ण नगर आदी भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून अनेक ठिकाणी आजही नागरिकांना टॅंकर्सद्वारे पाणी घ्यावे लागत आहे. तसेच भगवानबाबा नगर, शिव शक्ती नगर, श्रीकृष्ण नगर, महादेव बाग, समर्थ नगर, महाडा कॉलनी, सत्यदेव नगर, पिंगळे मळा, रॉयल टाऊन, मानकर मळा आदी भागातील रस्ते मंजूर असून देखील अद्याप वर्क ऑर्डर काढत नसल्याने रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे.




त्यामुळे या भागातील नागरिकांची घरपट्टी व पाणीपट्टी आकारणी करण्यात येवू नये. आजपर्यंतची घरपट्टी व पाणीपट्टी माफ करण्यात यावी, यासाठी प्रतीकात्मक घरपट्टी व पणीबिलांची होळी करण्यात आली. दखल न घेतल्यास मोठे जनआंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

यावेळी अ‍ॅड. सुरेश आव्हाड, अ‍ॅड. सुभाष गीते, वसंत पगार, मनोज कंसारा, धनेश रूणवाल, अ‍ॅड. आशा नाईकर, रंजना पगार, तारा निकम, मंदा गांगुर्डे, रंजना तांदळे, चंद्रकला भरसट, आबा पाटील, महेश चव्हाण, नानू पवार, मंदा कांबळे आदी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री. चंदुलाल शाह यांनी चैतन्य आर्ट्स, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक-३ येथे छापून भ्रमर कार्यालय, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक -३ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी २५१४६५०, २५११७६०
E-Mail-daily_bhramar@rediffmail.com नाशिकरोड संपर्क कार्यालय, बिटको क्लासिक, मुक्तिधाम समोर, नाशिकरोड, दूरध्वनी २४५६५४९. कार्यकारी संपादक- हितेश चंदुलाल शाह * पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
Printed, Published and Owned by Shri. Chandulal Shah and printed at Chaitanya Arts, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3 and published at Daily Bhramar, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3. * Editor : Chandulal Shah * Executive Editor : Hitesh Chandulal Shah.